# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१९

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### औरंगाबाद येथील कर्करोग रुग्णालयात मंजूर पदे भरण्यास विलंब होत असल्याबाबत

**(१) २११२ (३०-१२-२०१४). श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील कर्करोग रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांची ३५९ पदे मंजूर आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रिक्त पदांमुळे रुग्णांना योग्यत्या आरोग्य सुविधा मिळत नसल्याने त्यांची हेळसांड होऊन त्यांना अडी-अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उपरोक्त मंजुर असलेली रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, रिक्त पदे भरण्यास विलंब होण्याची कारणे काय,

(५) असल्यास, पदे किती कालावधीत भरली जाणार आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१६-०९-२९१९) :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) औरंगाबाद कर्करोग रुग्णालयासाठी मंजूर ३५९ पदांपैकी ९७ पदे सद्यस्थितीत रिक्त आहेत. रिक्त पदांपैकी कनिष्ठ निवासी-२ व ३ मधील ४८ पदांपैकी विद्यावेतनाचे अनुदान प्राप्त होताच सदर पदावर नियुक्ती करण्यात येईल. तसेच रिसर्च फेलोच्या २४ पदांची सेवाप्रवेश नियम मंजूर झाल्यावर भरण्यात येतील. उर्वरित २५ रिक्त पदे भरण्याची कार्यवाही प्राथम्याने करण्यात येत आहे.

---

## उरण तालुक्यात (जि.रायगड) येथे एमआयडीसी परिसरातील ज्वलनशील, रासायनिक पदार्थांमुळे होणाऱ्या दुर्घटनांबाबत

**(२) ५५४५९ (२२-०८-२०१६). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण तालुक्यात (जि.रायगड) येथे एमआयडीसी परिसरातील ज्वलनशील, रासायनिक पदार्थांची साठवणूक केली जात असून या ठिकाणी अनेक स्फोटाच्या व आगीच्या घटना घडूनही या समस्येवर उपाययोजना व नियंत्रण करण्यासाठी स्वतंत्र आपत्कालिन समिती अस्तित्वात नाही, हे खेर आहे काय,

(२) असल्यास, डोंबिवली सारखी घटना घडू नये म्हणून शासन उरण एमआयडीसीमध्ये स्वतंत्र आपत्कालिन समिती स्थापन करणार आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला, त्याचे स्वरुप काय आहे ?

**डॉ. संजय कुटे (२०-०९-२०१९) :** (१) हे खरे नाही.

उरण तालुक्यात कारखाने अधिनियम,१९४८ खाली एकूण ६६ कारखाने नोंदणीकृत असून काही कारखान्यांत ज्वलनशील व रासायनिक पदार्थांची साठवणूक केली जाते. मागील तीन वर्षात यापैकी एका कारखान्यात आगीची घटना घडली असून त्यामध्ये कोणीही मृत अथवा जखमी झालेले नाही. स्फोटाची घटना घडलेली नाही.

(२) व (३) मे.प्रोबेस एंटरप्रायझेस, डोंबिवली या कारखान्यात दिनांक २६.०२.२०१६ रोजी झालेल्या स्फोटाच्या घटनेची सखोल चौकशी करण्याकरिता आणि भविष्यात अश्या प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती होवू नये याबाबत उपाययोजना सुचविण्याकरिता दिनांक २७.०५.२०१६ च्या शासन आदेशान्वये जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या अध्यक्षतेखाली तज्ञ व्यक्तींची समिती स्थापन करण्यात आली होती. प्रोबेस कंपनीत झालेला स्फोट, त्यानंतर नेमण्यात आलेली चौकशी समिती व चौकशी समितीच्या अहवालासंदर्भात सर्व संबंधित विभागांना समितीच्या निष्कर्षाप्रमाणे व सूचनेप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत वेळोवेळी कळविण्यात आले आहे.

यासंदर्भात तत्कालिन मा.मंत्री (कामगार) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २१.०१.२०१९ रोजी झालेल्या आढावा बैठकीमधील इतिवृत्तानुसार कारखान्यात कामाच्या ठिकाणी सुरक्षा, आरोग्य व वातावरणाबाबत धोरण निश्चित करण्यासंदर्भात औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, मुंबई यांचेकडून सेफ्टी पॉलीसीच्या मसुद्यामध्ये (Safety Policy Draft) संबंधित विभागांना काही सुचना/ अभिप्राय/ हरकती सुचवायच्या असल्यास त्या या विभागाकडे पाठविण्याबाबत विनंती करण्यात आली आहे. त्यानुषंगाने सर्व संबंधित विभागांकडून त्यांची माहिती प्राप्त झाल्यानंतर सुरक्षा धोरण तयार करण्याची कार्यवाही करणे शक्य होणार आहे.

---

**श्रेयस सिग्नल ते चिराग नगर पोलीस ठाणे (घाटकोपर (प)) या परिसरातील वाहतूक कोंडी सोडविण्याबाबत**

**(३) ८४२०४ (१३-०४-२०१७). श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घाटकोपर पश्चिम येथील एल.बी.एस. मार्ग श्रेयस सिग्नल ते चिराग नगर पोलीस ठाणे या परिसरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी रस्ता रुंदीकरण करण्याची मागणी गत १० वर्षांपासून स्थानिकांकडून वारंवार लेखी स्वरुपात करून देखील अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त परिसरातील वाहतूक कोंडीमुळे वारंवार होत असलेल्या अपघातात नागरिक मृत्युमुखी पडत असल्याच्या घटनाही घडलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त परिसरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी रस्ता रुंदीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०९-२०१९) :** (१), (२), (३) व (४) घाटकोपर पश्चिम येथील एल.बी.एस. मार्ग श्रेयस सिग्नल ते चिराग नगर पोलीस ठाणे रस्ता रुंदीकरण करण्याच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली/येत आहे :-

• रस्तारेषा पूर्ण उपलब्ध असलेल्या ठिकाणी पदपथ, पर्जन्य जलवाहिन्या सुधारण्याचे कार्य प्रगतीपथावर आहे.

• सदर रस्त्यावरील मुंबई मेट्रो फेज-४ अंतर्गत वडाळा ते ठाणे या मार्गाचे काम प्रगतीपथावर आहे.

• एल.बी.एस. मार्ग रुंदीकरणातील बाधीत ५८७ बांधकामधारकांना मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३१४ अन्वये नोटीस देण्यात आली असून, ९० अपात्र बांधकामे निष्कासित करण्यात आली आहेत.

• बांधकाम निष्कासित करण्यात आलेल्या रस्ता रेषेवरील रस्ता बांधणीचे काम सुरु आहे.

सदर परिसरात सन २०१४ ते माहे फेब्रुवारी २०१९ या कालावधीत ४ अपघात झाले असून, त्यामध्ये ५ व्यक्तींचा मृत्यू झाल्याचे गृह विभागामार्फत कळविण्यात आले आहे.

---

**मुंबई शहरातील इमारतींचा पुनर्विकास रखडल्याबाबत**

**(४) ८४७५९ (२१-०४-२०१७). ॲड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील कित्येक इमारतींचा पुनर्विकास प्रकल्प एक-दोन दशकांपासून सुरू होवू न शकल्यामुळे त्यातील कुटुंबे संक्रमण शिबिरामध्ये राहत असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मूळ इमारतींच्या जागी नव्या इमारती उभ्या राहत आहेत, त्यातील मूळ भाडेकरूंना म्हाडाकडून मास्टर लिस्टव्दारे नवे घर देण्याची प्रक्रिया सुरू आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबई झोपडपट्टी पुनर्वसन समिती नामक तथाकथित संस्थेचे अध्यक्ष चांगदेव वानखेडे व दलालामार्फत वडाळा, मानखुर्द, भारतनगर (वांद्रे) व मुंबईत इतरत्र संक्रमण शिबिरामधील मोकळया घरांमध्ये खोटया बनावट कागदपत्रांच्या आधारे घुसखोरी होत असून या आरोपी विरोधात कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रश्नोक्त प्रकरणी शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (०३-०९-२०१९) :** (१) अंशत: खरे आहे.

ज्या उपकर प्राप्त इमारती धोकादायक स्थितीत असल्यामुळे तोडण्यात आल्या आहेत, अशा इमारतीमधील रहिवाशांना मंडळाच्या संक्रमण शिबीरामध्ये स्थलांतरीत केले जाते. असे एकूण २९५ भूखंड असून, त्यापैकी काही भूखंड हे अरुंद किंवा रस्ता रुंदीकरणामुळे तसेच विकास आराखड्यातील विविध आरक्षणामध्ये बाधीत असल्याने तेथे पुनर्विकास होवू शकत नाही, अशा भूखंडावरील उपकर प्राप्त इमारतीतील भाडेकरु /रहिवाशी हे मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाच्या संक्रमण शिबीरामध्ये बऱ्याच कालावधीपासून वास्तव्यास आहेत.
(२) हे खरे नाही.

ज्या अरुंद भूखंडावरील जुन्या उपकरप्राप्त इमारती तोडल्या आहेत अशा भूखंडावर जेथे नवीन इमारतीचे काम सुरु करणे शक्य नाही. अशा तोडण्यात आलेल्या इमारतीमधील भाडेकरु/रहिवाशांना बृहतसूचीनुसार (मास्टर लिस्टनुसार) कायमस्वरुपी पर्यायी सदनिका देण्याची प्रक्रिया म्हाडा प्राधिकरणामार्फत नियमानुसार करण्यात येते.
(३) मुंबई झोपडपट्टी पुनर्वसन समिती नामक तथाकथित संस्थेचे अध्यक्ष चांगदेव वानखेडे व त्यांच्या साखळीतील दलालामार्फत वडाळा, मानखुर्द, भारत नगर (वांद्रे) व मुंबईत इतरत्र ट्रांझिस्ट मधील मोकळ्या घरांमध्ये खोट्या बनावट कागदपत्रांच्या आधारे घुसखोरी केलेबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार प्राप्त झालेली नसल्याचे मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने कळविले आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भांबेड, तहसील-लांजा (जि.रत्नागिरी) येथील नागरीकांकडून अकृषित आकारणी उपकरासह वसूल करण्यात येत असल्याबाबत**

**(५) ८४७७१ (२०-०४-२०१७). ॲड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा-रत्नागिरी अंतर्गत गांव-भांबेड, तहसील-लांजा येथील नागरीकांकडून-सर्रासपणे दंडात्मक कारवाई आदेश क्रमांक/एलएनए/वि.प/९२, तहसीलदार कार्यालय, लांजा, दिनांक २६ डिसेंबर, २०१६ अन्वये अकृषित आकारणी उपकरासह रूपये १,४७०/- वसूल करण्यात येत असून ही कारवाई शासनाच्या नविन अकृषित बिनशेती धोरणाच्या निर्णयाच्या विसंगत असल्याचे निष्पन्न झाले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील गावातील सन २००५ सालापासून आतापर्यंत किती बांधकामांना बिनशेती (अकृषित) ठरवून कारवाई करण्यात आली वा बांधकामे नियमित करण्यात आली,
(३) असल्यास, इंदिरा आवास, रमाई आवास योजने अंतर्गत बांधण्यात आलेल्या घरकुलांना ही अकृषित ठरवून दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-०६-२०१९) :** (१), (२), (३), (४) व (५) मौजे भांबेड, ता.लांजा, जि.रत्नागिरी या गावातील एकूण २२९ प्रकरणांत बांधकाम परवानगी न घेतल्यामुळे महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ४५ अन्वये दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. इंदिरा आवास घरकुल योजना तसेच रमाई आवास घरकुल योजना अशा प्रत्येक घरकुल योजनेंतर्गत एका प्रकरणात दंडात्मक कारवाई करुन अकृषिक आकारणी उपकरांसहित वसूल करण्यात आली आहे. संबंधित घरमालक यांनी सदरचे घर उक्त घरकूल योजनेंतर्गत असल्याचे दंडात्मक कार्यवाहीवेळी निदर्शनास न आणून दिल्याने घरकूल धारकांच्या संमतीने उक्त वसूली करण्यात आली आहे.

---

### 'ब' सत्ता प्रकार मधील मालकी हक्काच्या जमिनींचे मिळकत पत्र करण्याबाबत

**(६) ९१३२८ (१२-०८-२०१७). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) 'ब' सत्ता प्रकार मधील मालकी हक्काच्या जमिनींचे मिळकत पत्र करण्याबाबत व करार संपलेल्या जमिनींबाबत सुधारित धोरण ठरविण्याबाबत आदेश मा.महसूल मंत्री यांनी दिनांक ३१ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास संबधित अधिकाऱ्यांना दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त आदेशाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

वि.स. ५९९ (६)

**श्री. चंद्रकांत पाटील (१७-०६-२०१९) :** (१) व (२) "ब" सत्ता प्रकार मधील मालकी हक्काच्या जमिनींचे मिळकत पत्र करण्याबाबत व करार संपलेल्या जमिनीबाबत सुधारित धोरण ठरविण्यासंदर्भात मा.मंत्री (महसूल) यांनी आदेश दिले असल्याचे आढळून आले नाही. तथापि, राज्यातील पुणे जिल्हयातील दौंड नगरपरिषद हद्दीतील सत्ता प्रकार 'ब' संवर्गातील मिळकती ह्या तत्कालीन मुंबई सरकारच्या सनदेद्वारा साऱ्याची रक्कम ठरवून मालकी हक्काने, दीर्घ मुदतीच्या भाडेपट्टयाने व लिलावाने प्रदान करण्यात आलेल्या आहेत, असे दिसून आले आहे. सदर मिळकतीसंदर्भातील सर्व सनदांमध्ये नमूद करण्यात आलेल्या तपशीलानुसार मिळकत निहाय विगतवारी करुन उचित प्रस्ताव जिल्हाधिकारी, पुणे यांच्यामार्फत शासन निर्णयार्थ सादर करण्याबाबत जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख, पुणे यांना कळविण्यात आले आहे. यासंदर्भातील प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर तपासून उचित निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजा कोकडी (ता.वडसा, जि.गडचिरोली) येथील सर्वे न.१६९ मधील ३.२८ हे.आर जमीन शासन जमा करण्याबाबत**

**(७) ९३७५९ (१२-०८-२०१७). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा कोकडी (ता.वडसा, जि.गडचिरोली) येथील सर्वे न.१६९ ही जमीन शासनाने १९६३-६४ मध्ये भूमिधारी हक्काने दिली होती सद्यस्थितीत त्या जमिनीपैकी १.८८ हे.आर. जमीनीवर कोणत्याही प्रकारचे उत्पन्न घेतले जात नसून जमीन पडीत आहे असा अहवाल तलाठी, कोकडी व मंडल अधिकारी, शंकरपूर यांनी दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जमीन शासन जमा करावी अशा गावकऱ्यांच्या मागणीनुसार जिल्हाधिकारी, गडचिरोली यांनी दिनांक २० मार्च, २००१ रोजी ३.२८ हे.आर जमीन सरकार जमा करण्याबाबत उपविभागीय अधिकारी व तहसिलदार, वडसा यांना आदेशीत केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त आदेशा नंतरही सदर जमीन शासन जमा न केल्याने दिनांक ९ एप्रिल, २०१३ रोजी ग्रामसभेने पुन्हा ठराव घेवून सदर जमीन शासन जमा कण्याबाबत विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सादर जमीन शासन जमा करण्यास विलंब लावणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करून तातडीने जमीन शासन जमा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२२-०२-२०१८) :** (१), (२), (३), (४) व (५) मौजा कोकडी, ता.देसाईगंज (वडसा) जि.गडचिरोली येथील स.नं.१६९ आराजी ६.४८ हे.आर जमीनीचा माजी सैनिक श्री.काशीनाथ मोत्या मेश्राम यांना १९६३-६४ मध्ये भूमिधारी हक्कावर पट्टा देण्यात आला होता. सदर जमिनीपैकी ३.२८ हे.आर जमीन पडीत असल्याचे आढळून आले. सन १९९८-१९९९, १९९९-२००० व २०००-२००१ मध्ये अर्जदारांचे वारस मुलगी यांनी ३.२० हे.आर मध्ये धानाचे पिक घेतल्याचे दिसून येते. तसेच सन २००१-२००२ या वर्षात ६.४८ हे.आर या पूर्ण जमिनीवर धानाचे पिक घेतल्याचे आढळून आले. त्यानुषंगाने त्यांना सदर जमिनीची उस्तवारी/सुधारणा करण्याची संधी देऊन तत्कालीन उपविभागीय अधिकारी, देसाईगंज यांनी दि.२६.०४.२००२ रोजीच्या आदेशान्वये उक्त जमीन सरकार जमा करण्याची कार्यवाही बाजूला ठेवून उक्त संपूर्ण जमीन वहीत करुन पिक घेण्याची संधी प्रदान केली.

उक्त ६.४८ हे.आर जमिनीच्या अभिलेखाची पडताळणी केली असता पट्टेदारकांच्या मृत्यूनंतर त्यांची वारस मुलगी व विधवा पत्नी उक्त जमिनीवर पीक घेत आहेत.

---

### कशेळी-काल्होर (जि.ठाणे) या गावात खारफुटीवर भराव टाकून बांधण्यात येणाऱ्या बेकायदेशीर २०० बांधकामांबाबत

**(८) १०६८७७ (०३-०४-२०१८). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिकेलगत कशेळी-काल्होर या गावात खारफुटीवर भराव टाकून बांधण्यात येणाऱ्या बेकायदेशीर २०० बांधकामावर एमएमआरडीएने केवळ नोटीस बजावण्याचे काम केले असून या विभागात अनेक अनधिकृत बांधकामे होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१८ मध्ये वा त्या दरम्यानच्या कालावधीमध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खारफुटीची तोड करुन भराव टाकणे, अनधिकृत बांधकामे करणे याची चौकशी करुन कारवाई करण्याचे आदेश मा.पालकमंत्री, ठाणे यांनी दिनांक १० जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास जिल्हा नियोजन बैठकीमध्ये दिलेले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय निदशर्नास आले तद्नुसार कशेळी-काल्हेर व भिवंडी तालुक्यात तसेच दिवा-मुंब्रा भागात खारफुटीवर भराव करून अनधिकृत बांधकामे करणाऱ्या विकासकांवर तसेच त्यांना अभय देणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०९-२०१९) :** (१) हे अशंतः खरे आहे. शासनाने दिनांक १७.०३.२००७ च्या अधिसूचनेन्वये भिवंडी परिसर अधिसूचित क्षेत्रासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची महाराष्ट्र प्रदेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ४० (१) (सी) अन्वये विशेष प्राधिकरण म्हणून नियुक्ती केली आहे. सदर अधिसूचित क्षेत्रातील सीआरझेडने बाधित झालेल्या क्षेत्रातील १८५ अनाधिकृत बांधकाम प्रकरणी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनिमय, १९६६ च्या कलम ५३ (१) नोटीसी बजावण्यात आल्या असून अधिनिमातील तरतूदीनुसार सदर प्रकरणी कार्यवाही सुरु आहे.
(२) हे खरे आहे. जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत मा.लोकप्रतिनिधींनी उपस्थित केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने मा.पालकमंत्री महोदयांनी अनाधिकृत बांधकाम करणारे रेती माफिया ज्या ठिकाणी रेतीचा उपसा करित आहेत त्या ठिकाणी जिल्हा प्रशासनाने त्वरीत कडक कार्यवाही करावी असे निर्देश दिले.
(३) भिवंडी तालुक्यातील मौजे केवणी, दिवे अंजूर, कशेळी, कोन या गावच्या खाडी किनाऱ्यावर कांदळवनाचा ऱ्हास तसेच कांदळवनावर माती व डेब्रीजचा भराव याबाबत प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी भिवंडी, विभाग भिंवडी यांचे कार्यालयाकडून संबंधित इसमांवर पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ चे कलम १५ व १९ अन्वये १ नारपोली पोलीस स्टेशन - २८, २ तालुका पोलीस स्टेशन भिंवडी-३, ३. कोन गाव पोलीस स्टेशन-१ असे एकूण ३२ गुन्हे सन २००८ पासून ते ०८/०४/२०१७ पर्यंत दाखल केलेले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बिताका प्रकल्पाचे (ता.अकोले, जि.अहमदनगर) प्रलंबित काम सुरु करण्याबाबत**

**(९) १०७१३५ (१०-०४-२०१८). श्री.अजित पवार (बारामती), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बिताका प्रकल्पाचे (ता.अकोले, जि.अहमदनगर) प्रलंबित काम तातडीने सुरु करण्यासह विविध मागण्यांकरीता स्थानिक लोकप्रतिनिधींनी व शेतकऱ्यांनी तहसिल कार्यालय,अकोले यांच्या कार्यालयावर दिनांक २७ जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास मोर्चा काढून आपल्या मागण्यांचे निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१७-०९-२०१९) :** (१) अंशतः खरे आहे.
बिताका प्रकल्पाचे (ता.अकोले, जि.अहमदनगर) प्रलंबित काम तातडीने सुरु करण्यासह विविध मागण्यांचे निवेदन दि.०१ ऑक्टोबर, २०१७ रोजी तहसिलदार कार्यालय, अकोले यांच्याकडे प्राप्त झालेले आहे.

(२) बिताका जलसिंचन प्रकल्पाकरीता आदिवासी विकास विभागाकडून प्राप्त निधी रु.३२२.०१ लक्ष पैकी एकूण रु.२२१.९० लक्षची कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत. शिल्लक राहिलेली कामे वन विभागाकडे तांत्रिक कर्मचारी नसल्याने व लघुसिंचन चराकरीता लागणारे क्षेत्र उपविभागीय अधिकारी, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर), उप विभाग संगमनेर यांच्याकडे हस्तांतरीत झालेले असल्याने ज्या विभागाकडे तांत्रिक क्षमता उपलब्ध आहे अशा विभागाकडे शिल्लक असलेला निधी शिल्लक निधी रु.१००.११ लक्ष वर्ग करुन त्या विभागाकडून सदर कामे पूर्ण व्हावीत म्हणून प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, राजूर ता.अकोले, जि.अहमदनगर यांच्याकडे प्रस्तावित करण्यात आले आहे.

तसेच सदर निवेदनातील उर्वरित विविध मागण्यांच्या अनुषंगाने नियमानुसार कार्यवाही करण्याबाबत संबंधित कार्यालयास तहसिलदार, अकोले यांच्यामार्फत दि.०४.१०.२०१७ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**परभणी जिल्हयातील सामान्य रुग्णालयातील मेट्रो रक्तपेढीचे हस्तांतरण करण्यात आलेले नसल्याबाबत**

**(१०) १०९८४२ (३१-०३-२०१८). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हयातील सामान्य रुग्णालयात सन २०११ मध्ये मेट्रो रक्तपेढी सुरु करण्यात आलेले काम सन २०१३ पर्यंत पुर्ण करुन जिल्हा रुग्णालय प्रशासनाकडे हस्तांतरीत करण्याची मुदत सार्वजनिक बांधकाम विभागाला दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुदतीस ३ वर्षाचा कालावधी पूर्ण होऊनही अद्याप सदर मेट्रो रक्तपेढीचे हस्तांतरण करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याची कारणे काय आहेत व सदर मेट्रो रक्तपेढी तातडीने जिल्हा रुग्णालय प्रशासनाकडे हस्तांतरण करण्याबाबत शासनाने कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२३-०८-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) मेट्रो रक्तपेढीचे काम पूर्ण करुन दि.३१/३/२०१५ रोजी उपभोक्ता विभागास हस्तांतरीत करण्यात आली असून सद्य:स्थितीत रक्तपेढी नवीन इमारतीमध्ये कार्यरत आहे.

---

**तारापुर ओद्‌योगिक परिसरातील वारंगळे क्षेत्रातील विराज प्रोफाइल कंपनीने आदिवासीच्या जमिनी बळकविल्याबाबत**

**(११) ११०१०८ (१८-०४-२०१८). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तारापुर ओद्योगिक  परिसरातील वारंगळे क्षेत्रातील विराज प्रोफाइल कंपनीने आदिवासींच्या जमिनी बळकविल्याचे दिनांक १३ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे, व त्यानुषंगाने विराज प्रोफाइल कंपनीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-०६-२०१९) :** (१) असे निदर्शनास आले नाही.
(२), (३) व (४) मौजे वारांगडे येथील गट क्र.६३/१, क्षेत्र २-०३.८ पो.ख.०-१८.० हे.आर ही जमीन श्री.माधव (महादू) झिणका सोहांग यांचा अर्धा हिस्सा व श्री.नवसू लाशा सोहांग यांचा अर्धा हिस्सा अशी सामायिकरित्या दाखल आहे. श्री.नवसू लाशा सोहांग व इतर ६ यांचे अर्धा हिश्याचे जमिनीवर बिगर आदिवासी इसम श्री.अब्दुल नईम चौधरी व इतर यांनी गोडावून व गाळ्यांचे बांधकाम केल्याचे निदर्शनास आले आहे. सदरची बांधकामे परवानगी न घेता केल्याने तहसिलदार, पालघर यांनी आदिवासी खातेदार यांना महाराष्ट्र अनुसुचित जमातीना जमीन प्रत्यार्पित करणे अधिनियम १९७४ मधील तरतुदीनुसार जमीन प्रत्यार्पित करणेबाबतचे आदेश दिनांक १२.१०.२०१८ रोजी पारीत केले आहेत. सदर आदेशाविरुध्द बिगर आदिवासी श्री.अब्दुल नईम मेहंदी चौधरी यांनी  उपविभागीय अधिकारी, पालघर यांचेकडे दाखल केलेल्या अपिलावर उपविभागीय अधिकारी, पालघर यांनी तहसिलदार, पालघर यांचे दिनांक १२.१०.२०१८ च्या आदेशास दिनांक २५.१०.२०१८ च्या आदेशान्वये स्थगिती दिलेली आहे.

---

## तोंडवळी तळाशील (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) किना-यावर स्वदेश दर्शन योजनेंतर्गत करण्यात येणाऱ्या भूसंपादनाबाबत

**(१२) ११४७५७ (२८-०३-२०१८). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाच्या स्वदेश दर्शन योजनेंतर्गत तोंडवळी तळाशील (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) किना-यावर पर्यटन सुविधा उभारण्याच्या प्रकल्पासाठी किनाऱ्यालगतच्या गावातील जमीनी संपादित करण्याची कार्यवाही सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर भूसंपादनाबाबत या गावातील ग्रामस्थांनी तहसिलदार, मालवण यांच्याकडे निवेदन देऊन त्याविरुद्ध आक्षेप घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर आक्षेप घेण्याची कारणे काय आहेत व ग्रामस्थांच्या विरोधामुळे पर्यायी भूसंपादनाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-०६-२०१९) :** (१) केंद्र पुरस्कृत स्वदेश दर्शन योजनेंतर्गत मौजे तोंडवली, ता.मालवण येथील भूसंपादनाबाबतचा प्रस्ताव प्राप्त नाही. परंतु स.नं.७७ हि. नं.१ क्षेत्र १९.१६.० हे. आर बिन आकारी सरकारी पड शासकीय जमीन केंद्र पुरस्कृत स्वदेश दर्शन योजनेंतर्गत सिंधुदुर्ग कोस्टल सर्किटचा विकास करणेसाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास हस्तांतरण करणेचा प्रस्तावकामी जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग कार्यालयाकडून कार्यवाही सुरु आहे.

(२), (३) व (४) सदर जमिनीबाबत तहसिलदार, मालवण यांचेकडे ग्रामपंचायत, तोंडवळी यांनी ग्रामसभेतील ठरावाची प्रत सादर केली आहे. सदर ठरावात ग्रामस्थांनी सचूना केली आहे की, स.नं.७७ हि. नं.१ मधून समूद्र किनारी जाण्या-येण्याचा एकमेव मार्ग आहे. मच्छिमाराची रापण व रापणीच्या होड्या काढून ठेवण्याची जागा आहे. सदर जागेतून रापणीची मासळी ने-आण करण्यासाठी वापर केला जातो. त्यामुळे सदरची जागा पारंपारिक मच्छिमारांसाठी राखीव क्षेत्र म्हणून ठेवणेची मागणी केलेली असून स्वदेश दर्शन योजनेसाठी अन्य जागेचा वापर करण्याची विनंती केली आहे.

---

## राज्यातील वाहतुक कोंडीची समस्या सोडविण्याबाबत

**(१३) १२६५०८ (११-१२-२०१८). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात तीन कोटी वाहनांची नोंदणी झाली असून यात सातत्याने वाढ होत असल्यामुळे सर्वाधिक म्हणजे ३२ लाख खाजगी वाहने मुंबईत असून यात दररोज ७०० वाहनांची भर पडत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सातत्याने वाढणाऱ्या वाहनांमुळे जागोजागी प्रचंड वाहतूक कोंडी होत असुन प्रवाशांचा वेळ आणि इंधनावर अधिक खर्च होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.केंद्रीय दळणवळण मंत्र्यांनी अलिकडेच १५ वर्षे वापरात असलेली वाहने वापरातून बाद करण्याचा कायदा करण्यात येत असल्याचे सूतोवाच केले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन वाहतुक कोंडी टाळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (११-०९-२०१९) :** (१) राज्यामध्ये दि.३१.०३.२०१८ अखेर एकूण ३.२९ कोटी वाहने अभिलेखावर नोंदणीकृत झाली आहे. मुंबईमध्ये सन २०१७-२०१८ या वर्षात एकूण २.४२ लाख खाजगी वाहनांची भर पडून ३१.०३.२०१८ अखेर मुंबईतील एकूण खाजगी वाहनांची संख्या २९.७१ लाख इतकी आहे. त्यानुसार मुंबईमध्ये दररोज सरासरी ८९६ इतक्या वाहनांची नोंदणी होते ही वस्तुस्थिती आहे.

(२), (३) व (४) मुंबई शहरातील वाहतूक नियमन व नियंत्रण तसेच वाहतूक कोंडी हया बाबी मोटार विभागाच्या अखत्यारीत येत नाही. सदर बाबी हया पोलीस विभाग (वाहतूक), बृहन्मुंबई महानगरपालीका व मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण या विभागांच्या अख्यत्यारित येत असून वाहतूक कोंडी टाळण्याकरीता पोलीस (वाहतूक) विभाग, मुंबई महानगरपालीका व मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण यांच्याव्दारे कार्यवाही केली जाते.

मोटार वाहन अधिनियम १९८८ व त्या अंतर्गत बनविलेल्या नियमांमध्ये वाहनाच्या नोंदणीवर निर्बंध घालण्याबाबतची तरतूद नाही.

(५) प्रश्न उदभवत नाही.

---

**राज्यातील मानधनावर कार्यरत असलेल्या कर्मचा-यांबाबत**
**समितीने केलेल्या शिफारशी**

**(१४) १२८००९ (०४-१२-२०१८). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) 'एकछत्र योजना' तयार करण्यासाठी महसूल व वन विभागाच्या दिनांक १८ मार्च, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील मानधनावर कार्यरत असलेल्या कर्मचा-यांचा विचार करण्यासंदर्भात स्थापन करण्यात आलेल्या समितीने सादर केलेल्या शिफारशीच्या अहवालाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याबाबत दिनांक १ ऑगस्ट,२०१८ रोजी वा त्यासुमारास उप सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय यांनी अप्पर मुख्य सचिव, वित्त विभाग, गृह विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, महसूल व वन विभाग व सचिव, महिला व बालविकास विभाग यांना पत्र दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पत्राच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२६-०६-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) कोतवालांना चतुर्थश्रेणी दर्जा देण्याबाबत संघटनेच्या मागणीच्या अनुषंगाने कोतवालांना चतुर्थश्रेणी दर्जा द्यावयाचा झाल्यास राज्यातील कोतवालांप्रमाणे इतरही मानधनावर असलेल्या कर्मचाऱ्यांचीही मागणी पुढे येण्याची शक्यता विचारात घेता, अशा मानधनावर कार्यरत असलेल्या सर्व कर्मचाऱ्यांचा एकत्रित विचार करुन त्यांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यासाठी, त्यांच्यासाठी "एकछत्र योजना" तयार करण्याकामी अभ्यास करुन शासनास शिफारस करण्यासाठी महसूल व वन विभाग, दिनांक १८ मार्च, २०१७ च्या शासन निर्णयान्वये अपर मुख्य सचिव (वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आली. सदर समितीने आपल्या शिफारशींसह सादर केलेला अहवाल तसेच कोतवालांच्या एकत्रित कामांचे स्वरुप, त्यांची पूर्णवेळ शासकीय कामाशी बांधीलकी विचारात घेता कोतवालांना देण्यात येणाऱ्या मानधनात सेवाजेष्ठतेनुसार मानधन वाढ करणे, त्यांना "राज्य शासकीय कर्मचारी समुह वैयक्तिक अपघात योजना", "अटल निवृत्तीवेतन योजना" व "महात्मा ज्योतिबा फुले जन

आरोग्य योजना" या योजनांचा लाभ देणे व त्यांचा चतुर्थ श्रेणीच्या सरळसेवेच्या पदांमध्ये शिपाई म्हणून प्रथम नियुक्तीचा कोटा २५% वरुन ४०% पर्यंत वाढविणे या संबंधी दिनांक ८ जानेवारी, २०१९ रोजीच्या मा.मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय घेण्यात आला व त्यानुसार दि.०६.०२.२०१९ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे.

---

**कल्याण (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील रिक्षाचालक नागरिकांकडुन जादा भाडे आकारणी करत असल्याबाबत**

**(१५) १३४५२८ (१५-१२-२०१८). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील रिक्षाचालक रेल्वे स्टेशन बाहेर रिक्षा उभ्या करत असल्यामुळे मोठ्या प्रमाणात वाहतुक कोंडी निर्माण होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रिक्षाचालक नागरिकांकडून युनियनने ठरवून दिलेल्या दरापेक्षा जास्त दर आकरणी करत असून याकडे वाहतुक विभागाचे अधिकारी दुर्लक्ष करीत असून या परिसरात कोणतेही वाहतुक पोलीस उपस्थित नसतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, परिवहन विभागाने दिलेला तक्रार निवारण क्रमांक लागत नसल्यामुळे नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तद्नुसार कल्याण येथील रिक्षाचालक युनियनने ठरवुन दिलेल्या दरापेक्षा जास्त दर आकारत असल्याबाबत कार्यवाही करुन दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (११-०९-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, कल्याण यांच्या संकेत स्थळावर माहे एप्रिल, २०१७ ते माहे मार्च, २०१९ या कालावधीत २४७ तक्रारी प्राप्त झाल्या असता ३२ तक्रारी निकाली काढल्या असून २४७ वाहन धारकांना कारणे दाखवा नोटीसा पाठविण्यात आलेल्या आहे. सदर कारवाईतून रू.३२,७००/-इतका दंड आकारण्यात आलेला आहे.

(४) मुंबई महानगर प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाच्या बैठकीत मंजूर केलेल्या भाडयानुसार दर आकारण्याबाबत सर्व रिक्षा चालकांना सूचना दिलेल्या आहेत. तसेच सर्व रिक्षा संघटनांची बैठक घेऊन रिक्षा चालकांना शेअर प्रमाणे व मीटर प्रमाणे होणाऱ्या नियमित भाडयाप्रमाणेच दर आकारण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

दि.०१.०१.२०१८ ते ३१.०१.२०१९ या कालावधीत ऑटोरिक्षांवर केलेल्या कारवाईत ५७९५ ऑटोरिक्षांची तपासण्यात आली असता ९१७ ऑटोरिक्षा दोषी आढळून आलेल्या आहेत. त्यापैकी ६३९ प्रकरणे निकाली काढण्यात आली असून ३५४ वाहनांचा परवाना व २५० वाहनांची अनुज्ञप्ती निलंबित करण्यात आलेली आहे. सदर कारवाईतून रू.२८,२३,३००/- इतका दंड वसूल करण्यात आलेला आहे.

ठरलेल्या भाडे दरापेक्षा जादा भाडे आकारणीबाबत नागरिकांकडून करण्यात आलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने जादा भाडे आकारणीबाबत कल्याण वाहतूक शाखेकडून २ केसेस करण्यात आलेल्या आहे. तसेच सन २०१७ ते सन २०१९ या कालावधीत वाहतूक (पोलिस) शाखेमार्फत करण्यात आलेल्या कारवाईत दोषी रिक्षा चालकांवर २४,६१६ केसेस  दाखल करण्यात आलेल्या असून सदर कारवाईत रू.५३,८०,८००/- इतकी दंड स्वरूपात वसूली करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे सोनाळे (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील वन विभागाच्या जागेत अतिक्रमण होत असल्याबाबत**

**(१६) १३४७८६ (०४-०६-२०१९). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे सोनाळे (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील सर्वे नंबर. २०१ वन / १५२ खाजगी/ २२७ वन येथे मे.अहुजा प्रा.लि कंपनीने वन विभागाच्या जागेत अनधिकृत इमारतींचे बांधकाम केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बांधकामांची माहिती मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी उप विभागीय अधिकारी, भिवंडी यांच्याकडे दिनांक १ ऑक्टोबर २०१८ रोजी वा त्यासुमारास प्रत्यक्ष व मेलद्वारे मागणी केली होती तथापि अद्याप सदर अनधिकृत बांधकामांची माहिती त्यांना उपलब्ध करून देण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,सर्वे नंबर. २०१ वन / १५२ खाजगी/ २२७ वन विभागाच्या जागेमध्ये बांधकाम करीत असताना वेळोवेळी स्थानिक नागरिकांनी व लोकप्रतिनिधी यांनी तक्रार दाखल केली असताना अद्याप कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर बांधकाम निष्कासित करण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१७-०९-२०१९) :** (१) मौजे सोनाळे, ता.भिवंडी, जि.ठाणे येथील सर्वे क्र.२०१ व सर्व्हे क्र.१५२ चे क्षेत्र वनक्षेत्र नसून खाजगी क्षेत्र आहे. सर्व्हे क्र. २२७ चे क्षेत्र राखीव वनक्षेत्र आहे. सदर वनक्षेत्रापैकी १००० चौ.मी. क्षेत्रात मे.अहुजा प्रा.लि. कंपनीने अनधिकृत इमारतीचे बांधकाम केल्याचे आढळून आले आहे.
(२) सदर बांधकामाची माहिती मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी उप विभागीय अधिकारी, भिवंडी यांच्याकडे दिनांक १.१०.२०१८ रोजी निवेदन सादर केले होते.

सदर निवेदनातील मागणीच्या अनुषंगाने तहसिलदार भिवंडी यांनी त्यांच्या दिनांक २८.१२.२०१८ रोजीच्या पत्रान्वये स्थानिक लोकप्रतिनिधी यांना बांधकामासंबंधित माहिती देण्याबाबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, उप प्रादेशिक कार्यालय, ठाणे व अपर तहसिलदार, भिवंडी यांना कळविले आहे.

(३) मौजे सोनाळे, ता.भिवंडी, जि.ठाणे येथील राखीव वन सर्व्हे क्र. २२७ मध्ये मेसर्स अहुजा प्रा.लि. कंपनीने १००० चौ.मी. क्षेत्रात अतिक्रमण केल्याने दिनांक १६.१०.२०१५ रोजी वनगुन्हा नोंदविण्यात आला आहे. तसेच सदर प्रकरणी दिवाणी न्यायालय, भिवंडी येथे रेग्युलर सिव्हिल सुट दाखल करण्यात आला असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.
(४) सदर अतिक्रमणासंबंधी उप विभागीय वन अधिकारी, मांडवी यांच्यामार्फत महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, १९६६ चे कलम ५३ व ५४ अंतर्गत संबंधितांना नोटीस बजावण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईसह राज्यभरात कत्तलखान्यांकडे जाणाऱ्या प्राण्यांच्या वाहतुकीत नियमांचे उल्लंघन होत असल्याबाबत**

**(१७) १३४९०८ (०९-०७-२०१९). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईसह राज्यभरात कत्तलखान्यांकडे जाणाऱ्या प्राण्यांच्या वाहतुकीत नियमांचे उल्लंघन केले जात असल्याचे माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नव्या वहातूक नियामनुसार आवश्यक असलेला विशेष परवानाही वाहन चालकांकडे नसल्याचेही निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रत्येक वाहनातील प्राण्यांच्या संख्येवरील मर्यादा, बकरी व बैल यांच्यासाठी स्वतंत्र जागा, प्राण्यांच्या हालचालीसाठी पुरेशी जागा, अन्य कोणतेही सामान नेण्यास मनाई आदी नियमांचे पालन करण्यात येत नसल्याचेही निदर्शनास येते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, विशेष परवाना नसणाऱ्या व नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (११-०९-२०१९) :** (१) व (२) याबाबत वस्तुस्थिती अशी आहे की, मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी जनहीत याचिका क्र. ३३/२०१६ मध्ये या संदर्भात दिनांक २५.०३.२०१९ रोजी प्राण्यांच्या वाहतुकीच्या संदर्भाने केंद्रीय मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम १२५-ई मधील तरतूदीनुसार अंमलबजावणी होत आहे अथवा मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम ८३ प्रमाणे कार्यवाही होत आहे, याबाबत खातरजमा करण्यासाठी आदेश पारीत केले आहेत.
आज रोजी नोंदणी प्राधिकाऱ्यांकडून केंद्रीय मोटार वाहन नियम १९८९ च्या सुधारित नियम १२५-ई मधील तरतूदीनुसारच प्राण्यांच्या वाहतुकीसाठी विशेष परवाने जारी केले जातात.
(३) व (४) क्षेत्रीय कार्यालयांच्याव्दारे वाहनांची प्रत्यक्ष तपासणी करुनच प्राण्यांच्या प्रकारनिहाय त्यांना वाहतूक करण्याचा परवाना प्रदान करण्यात येत आहे. तसेच नियमाप्रमाणे प्राण्यांची वाहतूक होत नसल्यास वायुवेग पथकांमार्फत त्यांच्यावर कार्यवाही करण्यात येते.

राज्यातील वायुवेग पथकाव्दारे माहे एप्रिल, २०१८ ते माहे २०१९ या कालावधीत अवैधरित्या प्राण्यांची वाहतूक करणाऱ्या वाहनांची तपासणी करण्यात आली असता ४१४ वाहने दोषी आढळून आलेली आहे. त्यात ३६ अनुज्ञप्ती, ६८ परवाने व २५ नोंदणी निलंबित करण्यात आलेली आहे. सदर कारवाईत रू.१२.१० लाख इतका दंड वसूल करण्यात आलेला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विलेपार्ले (मुंबई) येथे बसविण्यात आलेले बहुतांश सीसीटीव्ही कॅमेरे बंद अवस्थेत असल्याबाबत**

**(१८) १३५०३० (१२-०७-२०१९). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विलेपार्ले (मुंबई) येथे बसविण्यात आलेले बहुतांश सीसीटीव्ही कॅमेरे बंद अवस्थेत असल्याची बाब माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे गुन्हेगारांची ओळख पटविणे तसेच गुन्ह्यांची उकल होण्यास अडचण निर्माण झाल्यामुळे विभागातील गुन्ह्यांच्या संख्येत वाढ झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर क्षेत्रात दुसऱ्या टप्प्यात बसविण्यात येणाऱ्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांबाबत अद्यापपर्यंत कोणत्याच प्रकारची कार्यवाही करण्यात आली नसल्याचे समजते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, विलेपार्ले येथे बंद अवस्थेत असलेल्या सीसीटीव्ही कॅमेरांची दुरुस्ती तसेच त्यांच्या देखभालीची वारंवारिता ठरवून दुसऱ्या टप्प्यातील सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०८-२०१९) :** (१) व (२) मुंबईतील विलेपार्ले विधानसभा क्षेत्रामधील सर्व कॅमेरे चालू स्थितीत आहेत.
(३) व (४) दुसऱ्या टप्प्यात बसविण्यात येणाऱ्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांबाबत आराखडा तयार केला आहे व याबाबत कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबईतील ५५ हजार कुटुंब धोकादायक घरांमध्ये वास्तव्य करीत असल्याबाबत**

**(१९) १३५५६० (११-०७-२०१९). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील बेलापूरपासून दिघ्यापर्यंत सुमारे ५५ हजार कुटुंब धोकादायक घरांमध्ये वास्तव्य करीत असल्याची बाब माहे मार्च, २०१९ च्या तिस-या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या धोकादायक इमारतींचा पुर्नविकास करण्यासाठी शासनाने अडीच एफएसआय मंजूर करून चार वर्षे होऊनही धोकादायक इमारतींच्या पुनर्विकासाला परवानगी मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या अनुषंगाने शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०९-२०१९) :** (१) • नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात सन २०१८-१९ मध्ये एकूण ३७८ इतक्या धोकादायक इमारती घोषित करण्यात आलेल्या आहेत.

• त्यापैकी सी-१, अतिधोकादायक, राहण्या अयोग्य व तात्काळ निष्कासित करणे प्रवर्गमध्ये मोडणाऱ्या अशा एकूण ५८ इमारती घोषित करण्यात आलेल्या आहेत.

• सदर सी-१ प्रवर्गातील इमारतीमध्ये अंदाजित २, २७३ इतके कुटुंबे वास्तव्यास आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

(२) व (३) • नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात सिडकोने बांधलेल्या व सद्यस्थितीत धोकादायक/ मोडकळीस आलेल्या इमारतींच्या पुनर्विकास/पुनर्बांधणीसाठी प्रोत्साहनात्मक वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर करण्याची तरतूद आहे.

• तथापि, त्यापुर्वी आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांचे अध्यक्षतेखाली तज्ञ समितीमार्फत अशा इमारती धोकादायक/मोडकळीस आले असल्याची ओळख पटविण्याची तरतूद महानगरपालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावली मधील नियम क्र. ४६(३) मध्ये करण्यात आलेली आहे.

• सदर रस्त्यांचे चटई क्षेत्र काही ठिकाणी १५.०० मी. पेक्षा कमी असल्याने २.५० चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय होत नाही. महानगरपालिकेने दि.०४.०२.२०१८ च्या आदेशान्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम २१० मधील तरतूदीनुसार रस्त्याच्या नियमित रेषा विहीत करण्यात आलेल्या आहेत.

• प्रस्तुत प्रकरणी मा.उच्च न्यायालय व शासनाचे वेळोवेळी प्राप्त होणारे ओदश तसेच नवी मुंबई महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमानुसार प्रस्ताव महानगरपालिकेस प्राप्त झाल्यास पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येणार असल्याचे, नवी मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

___________

## पुणे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये वडगाव पुल, माणिकबाग, गंगा भाग्योदय ते राजारामपुल रस्त्यालगत मोठ्या प्रमाणात अनधिकृत व्यवसाय सुरु असल्याबाबत

**(२०) १३५६२२ (११-०७-२०१९). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये वडगाव पुल, माणिकबाग, गंगा भाग्योदय ते राजारामपुल पर्यंतच्या दोन्ही बाजूच्या रस्त्यावर, फुटपाथवर तसेच रस्त्यालगत मोठ्या प्रमाणात व्यावसायिक हातगाड्या, पथारी, खाद्यपदार्थ विक्रेत्यांकडून अनधिकृत व्यवसाय सुरु असल्याचे निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू व्यावसायिक हातगाडया, पथारी, खाद्यपदार्थ विक्रेत्यांमुळे या रस्त्यावर मोठया प्रमाणात वाहतूक कोंडी होत असून नागरिकांचे जिवितास धोकादायक होत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी संबंधित प्रशासनाकडून कोणतीही कार्यवाही होताना दिसत नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१९) :** (१), (२), (३) व (४) • सदर ठिकाणी पूर्वीपासून व्यवसाय करणाऱ्या पथविक्रेत्यांची पथविक्रेता (उपजिविका संस्था व पथविक्री विनियमन) अधिनियम, २०१४ च्या अंतर्गत संगणकीय नोंदणी करुन त्यांचे प्रस्तुत ठिकाणी पुनर्वसन करण्यात आले आहे.

• सदर नोंदणीकृत फेरीवाला व्यावसायिकांची पुनर्वसन कार्यवाही चालू आहे.

• तथापि फेरीवाला नोंदणी पत्रातील अटीशर्तीचे उल्लंघन करणाऱ्या पथविक्रेत्यांवर तसेच अनधिकृत व्यावसायिकांवर नियमांनुसार दैनंदिन कारवाया करण्यात येतात.

• या व्यतिरिक्त अधिकृत व्यावसायिकांवर नियंत्रण ठेवून वाहतुकीस अडथळे होणार नाहीत याची दक्षता घेतली जात आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वारजे (ता.हवेली, जि.पुणे) येथे वृणवाल सोसायटी लगत नाल्याची सीमाभिंत कमकुवत झाल्याबाबत

**(२१) १३५७३४ (११-०७-२०१९). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वारजे (ता.हवेली, जि.पुणे) येथे वृणवाल सोसायटी येथील नाल्यालगतची सीमाभिंत कमकुवत झाली असून धोकादायक अवस्थेत असल्याचे माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाल्याच्या सिमाभिंतीला लागून लोकवस्ती असून पावसाळ्यापूर्वी नाल्यालगतची धोकादायक भिंत दुरुस्त न केल्यास भविष्यात मोठी दुर्घटना होऊ शकते असे असतांना संबंधित प्रशासनाकडून कुठलीही कार्यवाही होत नसल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रश्नाबाबत वारंवार विविध वृत्तपत्रातून तसेच तक्रारीद्वारे ही बाब निदर्शनास येत असतांना शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१९) :** (१), (२) व (३) • वृणवाल सोसायटी, वारजे, ता. हवेली, जि.पुणे येथील नाल्यालगत ३० मी. लांब व २ मी. उंच सीमाभिंत कमकुवत झाली असून धोकादायक अवस्थेत आहे हे खरे आहे.

• सदर सीमाभिंत धोकादायक असल्याचे निदर्शनास आल्याने, पुणे महानगरपालिकेकडून वृणवाल सोसायटीस नोटीस देण्यात आली असून, त्या अनुषंगाने पुढील योग्य ती कार्यवाही सुरु आहे, असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई उपनगरातील अंधेरी (पश्चिम) येथील अनधिकृत रिक्षा चालकांविरोधात प्राप्त झालेल्या तक्रारींबाबत

**(२२) १३५८८३ (०९-०७-२०१९). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील अंधेरी पश्चिम येथील व्हीपीरोड व जेपी रोडवरील अनधिकृत रिक्षा चालकांच्या मनमानी कारभारामुळे त्यांच्या विरोधात स्थानिक नागरीकांनी केलेल्या अनेक तक्रारी गत अडीच वर्षापासून अंधेरी आरटीओ व डी एन नगर वाहतूक विभागास प्राप्त झाल्या असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी डी एन नगर वाहतूक विभाग व अंधेरी आर.टी.ओ. कडून संयुक्त कारवाई करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास,सदर परिसर अनधिकृत ऑटोरिक्षांपासून मुक्त करण्यास कारवाई न करणा-या डीएन नगर वाहतूक विभाग व अंधेरी आर.टी.ओ.च्या अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (११-०९-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२) प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (पश्चिम) यांच्या अधिनस्त वायुवेग पथकाव्दारे दिनांक ०१.०४.२०१८ ते २१.०३.२०१९ या कालावधीत व्ही.पी.रोड तसेच जे.पी.रोड आणि आसपासच्या परिसरात अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या ॲटोरिक्षा विरुध्द करण्यात आलेल्या कारवाईत ५१५ वाहनांची तपासणी करण्यात आली असता १२३ वाहने दोषी आढळून आलेली आहे. त्यात अवैध प्रवासी वाहतूक करताना ११५ वाहने दिसून आलेली आहे. त्यात १२ खाजगी ॲटोरिक्षांचा समावेश असून जप्त करण्यात आलेली वाहनांची संख्या २५ इतकी आहे. सदर कारवाईत २.६८ लाख इतका दंड वसूल करण्यात आलेला आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**एमएमआरडीएने मंजुरी दिलेल्या खाडी किना-यालगत बाळकूम ते गायमुख (जि.ठाणे) येथील रस्त्याच्या कामाबाबत**

**(२३) १३५९४३ (११-०७-२०१९). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे येथील वाहनांची वाढती संख्या तसेच शहरातून जात असलेल्या महामार्गावरील वाहनांची गर्दी यातुन मार्ग काढण्यासाठी एमएमआरडीएने मंजुरी दिलेल्या खाडी किना-यालगत जाणाऱ्या (बाळकूम ते गायमुख) रस्त्याच्या कामासंदर्भात सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केलेली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार वाहतुकीची समस्या सोडविण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यासंदर्भात आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०९-२०१९) :** (१), (२) व (३) ठाणे घोडबंदर बाह्यवळण रस्त्याचे सर्व्हेक्षण, ढोबळ अंदाज खर्च, पर्यावरण व इतर विभागांची परवानगी, भूसंपादन इत्यादी बाबींसंदर्भातील कार्यवाहीच्या अनुषंगाने तज्ञ सल्लागार नेमणूकीकरीता ठाणे महानगरपालिकेमार्फत दिनांक १४ जून, २०१९ रोजी निविदा मागविण्यात आल्या आहेत.
ठाणे महानगरपालिकेने सदर कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन व आवश्यक परवानग्या घेवून, प्राधिकरणास अहवाल सादर केल्यानंतर एमएमआरडीएमार्फत पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.

---

**राज्यात उन्हाळी सुट्टीच्या हंगामात खासगी बस वाहतूकदार प्रवाश्यांकडून दुपट्ट दर आकारित असल्याबाबत**

**(२४) १३६००१ (०९-०७-२०१९). श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) राज्यात सद्यस्थितीत सुरु असलेल्या उन्हाळी सुट्टीच्या हंगामात खासगी बस वाहतूकदारांकडून विशेषतः कोकणासह शिर्डी, महाबळेश्वर व कोल्हापूर मार्गावरील प्रवाशांकडून तिकीट नियमित दरापेक्षा दुप्पट दराने आकारले जात असल्याने प्रवाशांची फसवणूक होत असल्याची बाब माहे एप्रिल, २०१९ च्या अंतिम आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात उन्हाळी सुट्टीच्या हंगामात प्रवाश्यांकडून दुपट्टीने तिकीट दर आकारणाऱ्या खासगी बस वाहतूकदारांच्या मनमानी कारभारास प्रतिबंध घालण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (११-०९-२०१९) :** (१) व (२) खाजगी बस चालकांकडून एसटी बस भाडेदराच्या तुलनेत दिड पटीपेक्षा जास्त भाडे आकारले गेल्याच्या ७९ तक्रारीं प्राप्त झाल्या. त्यापैकी ०२ प्रकरणात तसे निदर्शनास आलेले आहे. खाजगी बसच्या मनमानी भाडे आकारणीबाबत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे त्या त्या टप्पा वाहतूकीचे भाडेदर विचारात घेऊन खाजगी कंत्राटी परवाना वाहनाचे त्या संवर्गासाठी संपूर्ण बससाठी येणाऱ्या प्रती कि.मी. भाडे दराच्या ५० टक्के पेक्षा अधिक राहणार नाही, असे कमाल भाडेदर दि.२७.०४.२०१८ च्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेले आहे.

जादा भाडेवाढ रोखण्यासाठी खाजगी कंत्राटी वाहनांच्या बुकींगच्या जागी भेट देण्याचे व कारवाई करण्याबाबतचे तसेच खाजगी बस मालकांनी पूर्ण बससाठी आकारावयाचे महत्तम भाडेबाबतचा तक्ता तयार करून त्याप्रमाणे येणारा प्रती आसन दर दर्शवून सदर खाजगी कंत्राटी वाहने ज्या ठिकाणाहून सुटतात, अशा ठिकाणी प्रवाशांच्या माहितीसाठी प्रदर्शित करण्याबाबतचे आदेश सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी व सर्व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना देण्यात आलेले आहेत व त्याप्रमाणे प्रदर्शित करण्यात आले आहेत. तसेच प्रवाश्यांच्या सोयीकरीता हेल्पलाईन क्रमांक ०२२६२४२६६६६ व www.transport.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर जादा भाडेदरासंदर्भात तक्रार नोंदविण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आली असून याबाबत या विभागाने प्रसिध्दी पत्रकही प्रसिध्द केले आहे.

खाजगी बस चालकांकडून एसटी बस भाडेदराच्या तुलनेत ५० टक्के पेक्षा जास्त भाडे आकारल्याबाबतच्या एकूण ०२ प्रकरणी कारवाई करण्यात आली असून रू.९,४००/- इतका दंड वसूल करण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पुणे, मुळा-मुठा नदीपात्रामध्ये मोठ्या प्रमाणात राडा रोडा टाकण्यात येत असल्याबाबत

**(२५) १३६०६४ (११-०७-२०१९). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे, खडकवासला, कर्वेनगर, सिंहगड रोड भागातील नदीपात्रालगतच्या बांधकामांच्या राडारोड्यामुळे मुळा-मुठा नदीचा प्रवाह बदलण्याचा धोका संभवत असल्याची गंभीर बाब मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खडकवासला, कर्वेनगर, सिंहगड रोड भागातील नदीपात्रालगतच्या बांधकामांचा राडारोडा सर्रासपणे नदीपात्रात टाकला जात असतांना संबंधित प्रशासनाचे अधिकारी त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याबाबत पुणे, महानगरपालिका आयुक्तांकडे माहे मार्च, २०१९ मध्ये वा दरम्यान तक्रार करण्यात आल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मोठ्या प्रमाणात सुरु असलेली बांधकामे आणि या कामांचा राडारोड नदीपात्रात टाकण्यात येत असतांना याकडे दुर्लक्ष झाल्यास भविष्यात राडारोड्याचे प्रमाण वाढेल याबाबत वारंवार विविध वृत्तपत्रातून, सामाजिक संस्थांकडून कार्यवाहीची मागणी होत असतांना संबंधित प्रशासनाकडून कुठलीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१९) :** (१), (२), (३) व (४) पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील मुठा नदीपात्रात राडारोडा टाकला जात असल्याची तक्रार पुणे महानगरपालिकेस प्राप्त झाली असून त्या अनुषंगाने तपासणी केली असता राडारोडा टाकण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे.

नदीपात्रात होणाऱ्या अनधिकृत बांधकामास प्रतिबंध घालण्यासाठी आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी परिपत्रक निर्गमीत केले असून असे बांधकाम व राडारोड आढळल्यास त्यास नोटीस देऊन त्वरीत कारवाई करण्यात येते.

नदीपात्रात बांधकामाचा राडारोडा टाकण्याची बाब निदर्शनास आल्यास त्यास प्रतिबंध करणेकामी २४ तास नदीपात्र व लगतच्या परिसरात निरीक्षणासाठी गस्त पथक नेमण्यात आलेले असून राडारोडा टाकणेस प्रतिबंध करणेकामी आवश्यक कार्यवाही करणेत येत असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### झोपडपट्टी पुनर्वसनात सदनिकांचे वाटप झाल्यानंतर विकासकांकडील अतिरिक्त घरे झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाने (एसआरए) ताब्यात घेतल्याबाबत

**(२६) १३६१६४ (०९-०७-२०१९). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) झोपडपट्टी पुनर्वसनात सदनिकांचे वाटप झाल्यानंतर विकासकांकडील अतिरिक्त घरे झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाने (एसआरए) ताब्यात घेण्यास सुरु केले असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विकासकाकडील अतिरिक्त घरे ताब्यात घेण्यासाठी एसआरएने पीएपी (प्रकल्पग्रस्त व्यक्ती) कक्ष चालू केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एसआरएने अद्यापपर्यंत किती अतिरिक्त घरे ताब्यात घेतली आहेत, त्यापैकी किती घरे पीएपी अंतर्गत प्रकल्पांमुळे बाधित झालेल्या झोपडीधारकांना वितरित करण्यात आली आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (३१-०८-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने प्रकल्पग्रस्त सदनिकांसाठी मिळकत व्यवस्थापन विभागाची स्थापना केली आहे.
(३) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामध्ये नोव्हेंबर २०१७ मध्ये मिळकत व्यवस्थापन विभाग कार्यान्वित झाला आहे. मिळकत व्यवस्थापन विभाग कार्यान्वित झाल्यानंतर एकूण ९५८ पी.ए.पी. सदनिकांचा ताबा घेण्यात आलेला असून दिनांक ३१.०५.२०१९ पर्यंत एकूण २२७ पी.ए.पी. सदनिका झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील पात्र झोपडीधारकांना व MCGM/MMRDA इत्यादी संस्थांना हस्तांतरीत करण्यात आलेल्या असल्याचा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा अहवाल आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### लातूर महानगरपालिकेच्या अग्निशमन दलातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(२७) १३६४२२ (११-०७-२०१९). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर महानगरपालिकेच्या अग्निशमन दलातील कंत्राटी कर्मचाऱ्यांची संख्या जास्त असून १७ अकुशल कर्मचारी असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आग, पूर, भूकंप तसेच इतर नैसर्गिक आणि मानवनिर्मित आपत्तींमध्ये महत्त्वाचे कार्य अग्निशमन दल करते, त्यामुळे अग्निशमन दलाची रिक्त पदे न भरण्यामागची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, लातूर महानगरपालिकेतील अग्निशमन दलातील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०९-२०१९)** : (१), (२) व (३) • लातूर शहर महानगरपालिकेच्या मंजूर आकृतीबंधातील विविध पदांचे सेवा प्रवेश नियम अंतिम झाल्यानंतर लातूर महानगरपालिकेतील अग्निशमन दलातील रिक्त पदे भरण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्याची तजवीज ठेवली असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नांदेड गाव ते किरकटवाडी (ता.हवेली, जि.पुणे) पर्यंतच्या रस्त्यावर दुषित सांडपाणी, प्लास्टिक कचरा व राडारोडा पडला असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याबाबत**

**(२८) १३६४२४ (११-०७-२०१९). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड गाव ते किरकटवाडी (ता.हवेली, जि.पुणे) पर्यंतच्या रस्त्यावर दुषित सांडपाणी, प्लास्टिक कचरा व राडारोडा पडला असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत नागरिकांच्या मोठ्या प्रमाणात तक्रारी असतांना संबंधित प्रशासनाच्या वतीने अद्यापही कुठलीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या रस्त्यालगत मोठ्या प्रमाणात लोक वस्ती व रहदारी असून या परिसरात अतिशय दुर्गंधी पसरली असून नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाच्या वतीने नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्याचा तपशील काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१९)** : (१), (२), (३) व (४) • माहे एप्रिल २०१९ मध्ये नांदेडगाव ते किरकटवाडी रस्त्यावर पुणे महानगरपालिकेची ड्रेनेज लाईन नादुरुस्त होती. त्यामुळे ते सांडपाणी रस्त्यावर होते. तसेच रस्त्यावर प्लास्टिक कचरा पडलेला होता.
• या प्रकरणी तक्रार प्राप्त झाल्यानंतर पुणे महानगरपालिकेमार्फत तातडीने जागा पाहणी करुन नादुरुस्त ड्रेनेज लाईन दुरुस्त करुन घेण्यात आली आहे. त्यामुळे सदर मलवाहीनी पुर्ववत प्रवाहीत करण्यात आली आहे.
• सध्या या भागात उघड्यावर सांडपाणी येणे बंद झाले आहे.
• तसेच गावातील रस्त्यावर पडलेला कचरा ग्रामपंचायत नांदेड तर्फे एकत्रित गोळा करुन पुणे महानगरपालिकेच्या कचरा डेपोकडे पाठविण्यात येतो.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे शहरातील बिबवेवाडी येथील स्वामी विवेकानंद मार्गावर सुरु असणाऱ्या विकासकामांमुळे जलवाहिन्या व सांडपाणी वाहिन्या फुटत असल्याबाबत**

**(२९) १३६६३७ (११-०७-२०१९). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील बिबवेवाडी येथील स्वामी विवेकानंद मार्गावर सुरु असणाऱ्या विकासकामांमुळे अनेक ठिकाणी दररोज पिण्याच्या पाण्याची व सांडपाणी वाहिनी फुटण्याचे प्रकार घडत असल्याने हजारो लिटर पाणी वाया जात असल्याचे माहे मार्च, २०१९ च्या शेवटच्या आठवडयात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पिण्याच्या पाण्यामध्ये सांडपाणी मिसळत असल्याच्या घटनादेखील निदर्शत येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी येथील प्रशासन टाळाटाळ करीत असल्याने स्थानिक नागरीकांमध्ये असंतोष पसरला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१९) :** (१), (२), (३) व (४) • पुणे पेठ बिबवेवाडी येथील स्वामी विवेकानंद मुख्य रस्त्यावरील पुष्पमंगल चौक ते महेश सोसायटी चौक दरम्यानच्या रस्त्याचे पुणे महानगरपालिकेमार्फत कॉंक्रीटीकरण करण्याचे काम करताना पाण्याची लाईन फुटण्याचे प्रकार घडले असल्याचे निदर्शनास आले होते.

• याबाबत प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने पाण्याची पाईपलाईन दुरुस्तीचे काम करण्यात आले असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील नायगाव बीडीडी चाळ पुनर्विकास अधिकाऱ्यांनी न्हाणीघरे आपल्या नावावर करुन घेतल्याबाबत**

**(३०) १३६६९५ (०९-०७-२०१९). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत म्हाडाकडून सुरु असलेल्या नायगाव येथील बीडीडी चाळींच्या पुनर्विकासात सार्वजनिक बांधकाम विभागातील नऊ अधिकाऱ्यांनी या चाळीत असलेली न्हाणीघरे अर्थात सार्वजनिक मोरी आपल्या नावावर करुन घेतल्याचे दिनांक २५ एप्रिल, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे ही न्हाणीघरे आता या योजनेत "लाभार्थी" ठरली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन हा गैरप्रकार करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (३१-०८-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे. श्री.कालीदास कोळंबकर, मा.विधानसभा सदस्य यांनी दि.०१.०२.२०१९ रोजीच्या पत्रान्वये या संदर्भात शासनास तक्रार केली होती.
(२) हे खरे नाही. शासनाच्या दि.१८.०२.२०१९ च्या पत्रान्वये सदरहू मध्यवर्ती न्हाणीगृहांचे केलेले वाटप नियमबाह्य असल्याचे संचालक, बी.डी.डी. चाळ यांना कळविल्यानंतर त्या कार्यालयाच्या दि.२६.०२.२०१९ च्या आदेशान्वये सदरहू मध्यवर्ती न्हाणीगृहांचे निवासी सदनिका म्हणुन करण्यात आलेले वाटप रद्द करण्यात आलेले आहे.
(३) बी.डी.डी चाळीतील गाळ्यांसाठी अर्ज करुन न्हाणीगृहे वाटप झालेले संचालक कार्यालयातील संबंधित कर्मचारी तसेच यासंदर्भात संचालक, बी.डी.डी. चाळी यांना नियमबाह्यरितीने शिफारस करणारे तत्कालीन व्यवस्थापक, बी.डी.डी. चाळी व नियमबाह्य रितीने व चुकीचे संदर्भ देऊन दि.०६.१०.२०१७ रोजीच्या आदेशान्वये सदर कर्मचाऱ्यांना न्हाणीगृहाचे परस्पर भाडेदारी तत्वावर वाटप करणारे तत्कालीन संचालक यांचेवर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील तरतुदीनूसार तात्काळ कारवाई करणेकरीता शासन मान्यतेनंतर सदरहू प्रकरण गृहनिर्माण विभागाने सदर अधिकारी/कर्मचारी यांच्या आस्थापना हाताळणा-या सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविले आहे.

त्या अनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन, संबंधित अधिकाऱ्यांवरील शिस्तभंग विषयक कार्यवाहीचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, मुंबई यांच्याकडून मागविण्यात आला असून, सदर प्रस्ताव प्राप्त झाल्यावर त्यांच्याविरुध्द पुढील आवश्यक ती शिस्तभंगविषयक कार्यवाही नियमानुसार करण्यात येईल, असे सार्वजनिक बांधकाम विभागाने दि. १४.०६.२०१९ रोजी या विभागास कळविलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील परिवहन महामंडळाच्या ताफयातील एस.टी.च्या हिरकणी बसेस नादूरुस्त झाल्यामुळे प्रवाश्यांची होणारी गैरसोय

**(३१) १३७३५४ (०८-०७-२०१९). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील परिवहन महामंडळाच्या ताफयामधील सन १९८३ पासून सुरु झालेल्या एस.टी.च्या हिरकणी बसेस मोठया प्रमाणात नादुरुस्त झाल्याने प्रवाशांची गैरसोय होत असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास, आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एस.टी.ला शासनाकडून नवीन बसगाडया उपलब्ध होणार होत्या तसेच महामंडळातर्फे काही बसगाडया बांधल्या जाणार होत्या असे असताना देखिल अद्याप एकही नवीन बस एस.टी. कडे आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रश्नांबाबत निर्णय घेऊन निधीची तरतूद करुन एस.टी.ला नीवन बसगाडया देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१७-०९-२०१९) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) राज्य परिवहन महामंडळाद्वारे ७०० नवीन साध्या बसेस खरेदी करणेकरीता रु.२१०.०० कोटीची मागणी शासनाकडे केली होती. त्यापैकी रु.५०.०० कोटीचा निधी महामंडळास दिलेला आहे. उक्त निधी अंतर्गत चासीस उत्पादकांकडून २४५ चासीस खरेदी करण्यात आलेल्या असून, राज्य परिवहन महामंडळाच्या मध्यवर्ती कार्यशाळेत व बाहेरील बस बॉडी बांधणीकारांकडे बस बांधणीचे काम सुरु आहे. सद्यस्थितीत १५२ बसेसची बांधणी पुर्ण होवून त्यांचे राज्य परिवहन महामंडळाच्या विभागास वाटप करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे महानगरपालिका चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांसाठी असलेल्या वसाहती धोकादायक झाल्याबाबत

**(३२) १३७७९५ (११-०७-२०१९). प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेच्या सार्वजनिक स्वच्छता, पाणी पुरवठा, मैलापाणी, झाडकाम आदी कामे करणाऱ्या चतुर्थ श्रेणीतील कर्मचाऱ्यांसाठी २६ वसाहती उभारल्या असल्याचे माहे मे, २०१९ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या इमारती साधारणत: ५० वर्षापूर्वीच्या असून स्ट्रक्चरल ऑडीटवर दरवर्षी पाच लाखांपेक्षा अधिक खर्च केला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, इमारतीचे सज्जे आणि जीन्यांमध्ये कचरा पसरलेला असून ठिकठिकाणी भंगार सामान ठेवले आहे, छत गळत असणे, पाणी आणि स्वच्छतागृहांचा प्रश्न असून इमारती धोकादायक झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्यानुसार संबंधित दोषी असणाऱ्या व्यक्तींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१९) :** (१) सदर वसाहती चतुर्थ श्रेणीतील कर्मचारी तसेच बिगर महानगरपालिका (रस्ता रुंदी व इतर कारणाने बेघर झालेल्या) नागरिकांसाठी बांधण्यात आलेल्या आहेत.

(२) साधारणत: ३० वर्षापूर्वीच्या इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्यात येते. त्यानुसार सुमारे साधारणपणे ५ वर्ष किंवा तदनंतर आवश्यकतेनुसार स्ट्रक्चरल ऑडीट करण्यात येते.

पुणे महानगरपालिकेच्या वसाहतींच्या इमारती ५० वर्षापूर्वीच्या असुन त्यांचे स्ट्रक्चरल ऑडीटवर दरवर्षी पाच लाखांपेक्षा अधिक खर्च केला जात नाही, असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) सदर इमारतींमधील सज्जे आणि जीन्यामध्ये कचरा पसरलेला असून ठिकठिकाणी भंगार सामान ठेवले आहे.

सदर इमारती ५० वर्षे जुन्या असल्या कारणाने त्या धोकादायक झालेल्या आहेत या कारणाने तेथे पाणी गळतीचा प्रश्न उद्‌भवत आहे, तरी सदर धोकादायक झालेल्या इमारतींसाठी बीओटी तत्वावर पुर्नविकसनाचे काम प्रस्तावित आहे, असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) व (५) पुणे महानगरपालिकेमार्फत वसाहतीतील धोकादायक इमारती बीओटी स्वरुपात विकसित करण्याकरीता विकासकाची नेमणूक करण्यात आलेली आहे. या विकासकाकडून सदर ठिकाणी तात्पुरत्या निवासाची व्यवस्था करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे. तसेच महापालिकेच्या चाळ विभागाकडून नागरिकांचे पर्यायी जागेत स्थलांतरीत होण्याबाबत प्रबोधन करण्यात येत आहे, तथापि नागरिकांचा घर सोडण्यासाठी विरोध असल्यामुळे विलंब होत आहे.

---

## राज्यातील एस टी महामंडळाच्या अधिकृत थांब्यांवरील हॉटेलात प्रवाशांना मिळणा-या चहा नाश्ता या योजनेबाबत

**(३३) १३७९१५ (१५-०७-२०१९). कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील एस.टी. च्या ५० अधिकृत थांब्यांवरील हॉटेलात प्रवाशांनी तिकीट दाखविल्यास ३० रुपयात चहा नाश्ता देण्याची राज्य परिवहन महामंडळाची योजना असल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याबाबतच्या परिपत्रकात नाश्त्याची वेळ आणि प्रमाण याचा उल्लेख नसल्यामुळे प्रवाश्यांना या योजनेचा लाभ होत नसल्यामुळे यासंदर्भातील तक्रारीत वाढ झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच या उपक्रमाची माहिती बहुतांश प्रवाशांपर्यत पोहचलीच नसून याबाबतचे माहितीफलक अनेक हॉटेल चालकांनी हॉटेलच्या दर्शनी भागात लावले नसल्याने अनेक हॉटेल चालक दुप्पटीहून अधिक दर प्रवाश्याकडून आकारत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, त्यानुसार सदर योजनेबाबत काढलेल्या परिपत्रकात योग्य ते बदल करून प्रवाश्यांना अधिकाधिक सोयी सुविधा पुरविण्याबाबत तसेच जे हॉटेलचालक हे परिपत्रक अमलात आणत नाहीत त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१७-०९-२०१९) :** (१) होय.

(२), (३), (४) व (५) राज्यातील राज्य परिवहन महामंडळाने दिलेल्या अधिकृत थांब्यांवरील हॉटेलांमध्ये प्रवाशांना मिळणाऱ्या चहा+नाश्ता या योजनेबाबत महामंडळाच्या दि.०२.०१.२०१९ व दि.३०.०५.२०१९ च्या परिपत्रकांन्वये रु.३०/- मध्ये चहा + नाश्ता मिळण्याची वेळ सकाळी ७ ते १२ व सायंकाळी ४ ते ८ अशी नमूद करण्यात आली आहे. तसेच, सदर योजनेबाबत हॉटेल/मोटेलच्या दर्शनी भागात ३ फलक प्रदर्शित करुन, सदर फलकांवर खाद्य पदार्थांचे प्रमाण व दराबाबतची माहिती प्रदर्शित करण्याबाबतच्या सूचना दिलेल्या आहेत. जे हॉटेल/मोटेल चालक संबंधित परिपत्रकातील सूचनांचे पालन करणार नाहीत, त्यांचेवर कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मिरा-भाईदर महानगरपालिकेच्या कशिमिरा येथील अग्रवाल ग्रीन व्हिलेज वसाहतीमध्ये बेकायदा गाळयांचे बांधकाम झाल्याबाबत

**(३४) १३७९८४ (११-०७-२०१९). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा-भाईदर महानगरपालिकेच्या कशिमिरा येथील अग्रवाल ग्रीन व्हिलेज वसाहतीमध्ये बेकायदा गाळयांचे बांधकाम झाल्याचे दिनांक २६ मार्च, २०१९ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी अनधिकृत बांधकामाबाबत नगररचना आणि प्रभाग समितीचे अधिकारी अपयशी ठरत असून अनधिकृत बांधकामास अधिकारी संरक्षण देत असल्याने कोणतीही कार्यवाही होताना दिसत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केलेली आहे काय, चौकशीनूसार सदर अधिकारी व व्यवसायिक यांचेवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०९-२०१९) :** (१), (२) व (३) • मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या काशिमिरा येथील वसाहतीमध्ये बेकायदा गाळयांच्या बांधकामाबाबत श्री.कृष्णा गुप्ता या नागरिकाच्या दि. २०.१०.२०१८, दि.३०.१२.२०१८ व दि.१३.०२.२०१९ अन्वये महानगरपालिकेत तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.

• सदर जागेवर नियमबाह्य पध्दतीने ८ गाळे बांधून व्यावसायिक वापर सुरू असलेबाबत तक्रारीत नमूद केलेले आहे.

• सदर जागेवरील इमारतीस महानगरपालिकेने बांधकाम परवानगी/भोगवटा दाखला दिलेला आहे. सदर मंजूर रेखांकनात शॉपिंग सेंटर या इमारतीस तत्कालीन नगरपरिषदेने दि.१३.०७.१९९५ अन्वये मंजूरी दिलेली असून शॉपिंग सेंटरच्या इमारतीचे बांधकाम मंजूर नकाशानुसार झाले असल्याचे तसेच गाळ्याचे अनधिकृत बांधकाम झाले नसल्याचे, मिरा-भाईंदर महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात प्रवासी वाहतुकीच्या बसमधून मालवाहतुक होत असल्याबाबत

**(३५) १३८१३१ (१०-०७-२०१९). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात प्रवासी वाहतुकीच्या बसमधून मालवाहतुक बंद करण्यात यावी असे आदेश मा.परिवहन मंत्री यांनी माहे मार्च, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खाजगी ट्रॅव्हलर्समधून कुरियर सर्व्हिसच्या नावाखाली मालवाहतूक सुरु असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (११-०९-२०१९) :** (१) व (२) खाजगी बसेसमधून माल वाहतूक करण्यास कायदयाने बंदी आहे. अशा प्रकारची वाहतूक केल्याचे आढळून आल्यास परिवहन विभागातर्फे संबंधित वाहनांवर कारवाई करण्यात यावी, असे शासनाने आदेश दिले होते.

(३) परिवहन आयुक्त कार्यालयाने दि.२२.०१.२०१९ रोजी राज्यातील सर्व परिवहन कार्यालयांना खाजगी बसेसमधून होणाऱ्या अवैध माल वाहतुकीविरुध्द कारवाई करण्यासाठी दि.२४.०१.२०१९ ते दि.०७.०२.२०१९ या कालावधीत विशेष तपासणी मोहीम राबवावी म्हणून निर्देश दिले. त्यानुषंगाने २४०९ वाहने तपासण्यात आलेली असून ३८८ वाहने दोषी आढळून आली असून रू.१६.२१ लक्ष दंड वसूल करण्यात आला व ११ वाहनांची अनुज्ञप्ती निलंबित करण्यात आलेली आहे.

तसेच सन २०१७-१८ ते मे २०१९ या कालावधीत खाजगी बसेसमधून होणाऱ्या अवैध माल वाहतुकीविरुध्द केलेल्या कारवाईत २५,४५२ वाहनांची तपासणी करण्यात आली, यामध्ये १७२९ वाहने दोषी आढळून आली असून त्यापोटी रू.४३.८७ लक्ष दंड वसूल करण्यात आला व १८० वाहनांची अनुज्ञप्ती व १८३ वाहनांचे परवाने निलंबित करण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गांधीनगर पोलिस स्टेशन (जि.कोल्हापूर) येथील तीन कॉन्स्टेबलना बेटिंग बुकीसोबत मैत्री असल्याच्या तक्रारीवरुन निलंबित करण्यात आल्याबाबत**

**(३६) १३८१९४ (१३-०७-२०१९). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गांधीनगर पोलीस स्टेशन (जि.कोल्हापूर) येथील तीन कॉन्स्टेबलना हप्ते देण्यासंबंधी बेटिंग बुकीसोबत मैत्री असल्याच्या दाखल झालेल्या तक्रारीनुसार माहे मे, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निलंबित करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यांच्यावर कोणत्या कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे,
(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करून त्यांचेवर अद्यापपर्यंत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०९-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी पोलीस अधीक्षक, कोल्हापूर यांच्या दि.१५/०४/२०१९ रोजीच्या आदेशान्वये प्राथमिक चौकशीची कार्यवाही सुरु आहे.
(४) विलंब झालेला नाही.

---

**सिडकोच्या स्थापना दिनानिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या स्नेहसंमेलनास सिडकोतर्फे एक कोटी रुपये खर्च करण्यात आल्याबाबत**

**(३७) १३८२०९ (११-०७-२०१९). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिडकोच्या स्थापना दिनानिमित्ताने दरवर्षी अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या स्नेहसंमेलनास सिडकोतर्फे अनुदान दिले जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१७ व सन २०१८ या वर्षी आयोजित केलेल्या स्नेहसंमेलनास सिडकोतर्फे सुमारे एक कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात सिडकोच्या अध्यक्षांनी दिनांक २६ मार्च, २०१९ रोजी वा त्यासुमारास चौकशी करण्यात येईल असे घोषित केले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार संबंधितांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०९-२०१९) :** (१) व (२) होय.

सिडको महामंडळात दरवर्षी साधारणत: फेब्रुवारी ते मे दरम्यान कर्मचाऱ्यांसाठी वार्षिक स्नेहसंमेलन साजरे करण्यात येते. त्याप्रमाणेच सन २०१७ व २०१८ मध्ये देखील अशाच प्रकारे सिडको कर्मचाऱ्यांसाठी वार्षिक स्नेहसम्मेलन आयोजित करण्यात आले होते. सदर सिडको वार्षिक स्नेहसंमेलन आयोजनासाठी सिडको संचालक मंडळाच्या मंजूरीने अनुदान व कर्मचाऱ्यांसाठी आर्थिक भेट देण्यात आली आहे.
(३) मा.अध्यक्ष, सिडको अथवा त्यांचे कार्यालय यांच्याकडून अशा चौकशीबाबत कार्मिक विभाग, सिडको अथवा सिडको प्रशासनास प्रत्यक्ष अथवा लेखी स्वरुपात सूचना दिलेल्या नाहीत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कल्याण (जि.ठाणे) मधील पूर्व-पश्चिम भागाला जोडणारा पूल अतिशय धोकादायक अवस्थेत असल्याबाबत

**(३८) १३८३३९ (१२-०७-२०१९). श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण (जि.ठाणे) मधील पूर्व-पश्चिम भागाला जोडणारा पूल अतिशय धोकादायक अवस्थेत असून पुलावरील लोखंडी बिम गंजल्याने दुर्घटना घडण्याची शक्यता आहे मात्र प्रशासनाकडून सदर प्रकरणाकडे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, रेल्वे प्रशासनाच्या जनसंपर्क कार्यालयाकडे माहिती मागितली असता हा पादचारी पूल रेल्वे प्रशासनाचा नसून कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचा आहे असे सांगण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आयुक्तांमार्फत सदर प्रकरणी कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०९-२०१९) :** (१), (२) व (३) • कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात मुंबई-कल्याण रेल्वे लाईनवर दोन रेल्वे उड्डाणपुल आहेत. त्यापैकी डाव्या बाजूकडील ५५.२४ मी. लांबी असलेला पत्री रेल्वे उड्डाणपुल ब्रिटीशकालीन जुना असून, सदर पूल रेल्वे विभागामार्फत तोडण्यात आलेला आहे.
• सदर ठिकाणी रेल्वे उड्डाणपुलाचे बांधकाम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत प्रगतीपथावर आहे.

• उजव्या बाजूकडील दोन पदरी पत्रीपुल आरओबी सुस्थितीत असल्याचे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने कळविले आहे.

• रेल्वे रूळ व प्लॅटफॉर्मवरील भागात असलेले पादचारी पूल हे मध्य रेल्वेने बनविले असून त्याची देखभाल दुरुस्ती मध्य रेल्वे मार्फत करण्यात येते.

• कल्याण पूर्व भागात, सिध्दार्थ नगर-गणेश मंदिर परिसरात उतरणेकरिता एम.एम.आर.डी.ए. च्या अर्थसहाय्यातून कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमार्फत स्कायवॉक बांधण्यात आलेला आहे. सदर स्कायवॉक नुकताच वापरात आलेला असून सुस्थितीत आहे.

• कल्याण-पश्चिम भागातही कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने रेल्वेच्या पादचारी पुलापर्यंत थेट पोहोचण्यासाठी एम.एम.आर.डी.ए च्या अर्थ सहाय्यातून स्कायवॉक बांधलेला आहे. सदर स्कायवॉकचे तांत्रिक परिक्षण करण्यासाठी आय.आय.टी., मुंबई यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

•आय.आय.टी., मुंबई यांच्याकडून तांत्रिक परीक्षण अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्याची दुरुस्ती आवश्यक असल्यास कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमार्फत करण्यात येणार असल्याचे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जळकोट (जि.लातूर) तालुक्यात ग्रामन्यायालयाचे न्यायालयात रुपांतरित करून वसाहत व नविन इमारत बांधण्याच्या प्रलंबित असलेल्या प्रस्तावाबाबत

**(३९) १३८५५९ (११-०७-२०१९). डॉ.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळकोट (जि.लातूर) तालुक्यातील ग्राम न्यायालयाचे न्यायालयात रुपांतरीत करुन वसाहत व नविन इमारत बांधण्याचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असल्याचे माहे मे, २०१८ च्या दुस-या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुषांगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१९) :** (१) हे खरे नाही

मा.उच्च न्यायालय,मुंबई यांनी दिवाणी न्यायाधिश (क.स्त.) व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, जळकोट, जिल्हा लातूर येथे न्यायालय स्थापन करण्याचा प्रस्ताव न्यायालय व न्यायाधिश निवासस्थान यांचेसाठी जळकोट, जिल्हा लातूर येथे पुरेशी पायाभूत सुविधा उपलब्ध नसल्याने नाकारला आहे. तसेच जळकोट जिल्हा लातूर नवीन न्यायालयीन ईमारतीच्या व निवासी क्वार्टर बांधकामाबाबत कोणताही प्रस्ताव जिल्हा न्यायालय लातूर यांजकडून अद्याप सादर करण्यात आलेला नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नाशिक जिल्हयात वृक्षारोपण योजनेत वृक्षलागवडीचे उद्दीष्ट पूर्ण न झाल्याबाबत

**(४०) १३९३८९ (१२-०७-२०१९). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वनाच्छादित प्रदेशाची वाढ करण्यासाठी आखलेल्या वृक्षलागवड योजनेतंर्गत नाशिक विभागात ५ कोटी ८० लाख ८ हजार २१५ वृक्षा लागवडीचे उद्दीष्ट दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिलेल्या उद्दीष्टा एवढे खड्डे खणून तयार करणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात १ कोटी ७३ लाख ७६ हजार ८८० इतकेच खड्डे खणून तयार झालेले असल्याचे माहे एप्रिल, २०१९ च्या पहिल्या आठवडयात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नाशिक विभागात वृक्षलागवडीचे ठरवून दिलेले उद्दीष्ट पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (११-०९-२०१९) :** (१) हे खरे आहे.

(२) माहे एप्रिल २०१९ च्या पहिल्या आठवडयात खोदलेल्या खडडयांची संख्या १ कोटी ७३ लक्ष ७६ हजार ८८० आहे. हे खरे आहे, तथापि, सद्यस्थितीत नाशिक विभागात दिलेल्या उद्दिष्टाप्रमाणे खड्डे खोदण्यात आले असून वृक्ष लागवडीची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(३) सन २०१९ चे पावसाळयासाठी दिलेले वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट कृत्रिम पुनर्निर्मिती, नैसगिक पुनर्निमिती, वृक्ष तोडीच्या बदल्यात वृक्षारोपण इत्यादीद्वारे पूर्ण करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पुणे महानगरपालिकेच्या शाळांमधील ई-लर्निंग यंत्रणेच्या देखभाल व दुरुस्तीबाबत

**(४१) १४०१५८ (१३-०७-२०१९). श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेच्या शाळांतील गुणवत्ता वाढविण्याकरिता शाळांमध्ये कोट्यवधी रुपये खर्च करून ई-लर्निगची सुविधा पायाभूत यंत्रणा आणि संगणक लॅब सुरू करण्यात आले होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिका शाळांमधील निम्म्याहून अधिक शाळांमध्ये ॲप यंत्रणा बंद पडल्याने त्याची दुरवस्था झाली असून इंटरनेट सेवाही बंद असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर १२६ शाळांमधील ई-लर्निंग यंत्रणेची देखभाल दुरुस्तीची जबाबदारी निरनिराळ्या ठेकेदारांमार्फत करण्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महानगरपालिका शाळांतील ई लर्निंग सुविधा उभारणीचे केलेल्या कामाचे तज्ज्ञांमार्फत तपासणी करण्याकरिता समिती नेमण्यात येऊन सदर कामाची चौकशी करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१९) :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) • याबाबत, शासन पत्र दि. २१/७/२०१७ अन्वये संगणक लॅब, संगणक प्रशिक्षण आणि ई-लर्निंग बाबतच्या प्रकरणी चौकशी करण्याबाबत आयुक्त पुणे महानगरपालिका यांना निर्देश दिले होते.
• त्या अनुषंगाने पुणे महानगरपालिकेमध्ये त्रिसदस्यीय समिती गठीत करण्यात आली होती. समितीचा चौकशी अहवाल शासनास प्राप्त झाला असून त्या अनुषंगाने निविदा प्रक्रिया अथवा खरेदी प्रक्रिया पारदर्शक व स्पर्धात्मक घेण्याच्या दृष्टीकोनातून दक्षता घेण्याबाबत, तसेच समितीने निष्कर्षामध्ये सुचविलेले त्रुटींची पुर्तता तात्काळ करण्यात यावी व समितीने सुचविलेल्या उपाय योजनांची काटेकोर पुर्तता करण्याची दक्षता घेण्याबाबत, आयुक्त पुणे महानगरपालिका यांना दि.२३/०८/२०१८ च्या पत्रान्वये सुचना देण्यात आलेल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पुणे शहरातील वाकडेवाडी येथील पीएमसी कॉलनीच्या पुनर्विकास प्रकल्पाबाबत

**(४२) १४०२३० (१३-०७-२०१९). श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील शिवाजी नगर मतदारसंघातील वाकडेवाडी येथे सन १९७० मध्ये पीएमसी चालक/वाहक व कर्मचाऱ्यांसाठी पीएमसी कॉलनी उभारण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सुमारे साडेनऊ एकर जागेवर नऊ इमारतीत बांधण्यात आलेल्या अंदाजे ३०० खोल्यांची गत दहा-पंधरा वर्षांपासून दुरुस्ती न झाल्याने दुरवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सुमारे पन्नास वर्ष जुन्या झालेल्या पीएमसी कॉलनीतील इमारतीतील घरांना मोठ्या प्रमाणावर तडे जाऊन पाणी गळती होत असून घरातील भिंती कोसळत असल्याने सदर कॉलनीचा पुनर्विकास करण्याकरिता शासनस्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) असल्यास, सदर पीएमसी कॉलनीतील पुणे महानगरपालिकेच्या वतीने गरीब मुलांकरता चालविण्यात येणाऱ्या महानगरपालिकेच्या शाळेच्या इमारतीचीही दुरवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, भविष्यात होणाऱ्या दुर्घटना टाळण्याकरिता शासन वाकडेवाडी येथील पीएमसी कॉलनीच्या जागेवर प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घरे बांधून पुनर्विकास करणेबाबत मा.लोकप्रतिनिधी यांनी लेखी पत्राद्वारे आयुक्त यांच्याकडे मागणी केली होती, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, पीएमसी कॉलनीच्या जुन्या इमारती पाडून तेथे प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत सर्वांसाठी घरे हा प्रकल्प कार्यान्वित करण्याकरिता शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१९) :** (१), (२) व (३) • पुरग्रस्त, जळीतग्रस्त, गलिच्छ वस्ती निर्मुलनातील, रस्तारुंदीकरणात बाधीत व महानगरपालिका सेवकांसाठी सदर कॉलनी बांधण्यात आली आहे.
• या प्रकारच्या एकूण २८८ सदनिका असून बहुतांशी इमारतींचे आयुष्यमान सुमारे ५० वर्षे किंवा आसपास झाल्यामुळे इमारतींची दुरावस्था झालेली आहे, हि वस्तुस्थिती आहे.
• दरवर्षी महानगरपालिका अर्थसंकल्पात जसजशी आर्थिक तरतुद उपलब्ध असते, त्यानुसार सदरहु कॉलनीची आवश्यक त्या किरकोळ स्वरुपाची देखभाल दुरुस्तीची कामे करण्यात येतात.
• सदरहू इमारतींची झालेली दुरावस्था विचारात घेऊन महानगरपालिकेने सर्व इमारती पाडुन त्या ठिकाणी नव्याने इमारती बांधण्यात प्रकल्प राबविण्याच्या अनुषंगाने बीओटी तत्वावर हा प्रकल्प राबविण्याचे निश्चित केले होते.
• या प्रकरणी विकासक नियुक्तीबाबत आवश्यक निविदा मान्य करण्यात आली असून त्या अनुषंगाने सदर वसाहत पुनर्विकास करण्यासाठी आवश्यक ती प्रक्रिया सद्य:स्थितीत सुरु आहे.
(४), (५) व (६) सदर पीएमसी कॉलनीतील पुणे महानगरपालिकेच्या शाळेची इमारत सद्यस्थितीत शाळेसाठी वापरात आहे. सकृत दर्शनी शाळेची इमारत धोकादायक दिसून येत नाही, असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

प्रधानमंत्री आवास योजनेचे मुख्य निकष हे भारतात ज्याचे कोठेही घर नाही व ज्याचे वार्षिक उत्पन्न ३ लाखापेक्षा कमी आहे. अशी व्यक्ती या योजनेची लाभार्थी आहे. प्रस्तुत प्रकरणी पीएमसी कॉलनीतील रहिवाश्यांचे पुर्नवसन करणे ही बाब प्रधानमंत्री आवास योजनेचे निकषात येत नसल्याने पीएमसी कॉलनीचा अद्याप सदर योजनेत अंतर्भाव करण्यात आलेला नाही.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे येथील वृक्ष गणनेसाठी सिस्टीम आणि ग्लोबल पोझिशनिंग सिस्टीम करण्यात आल्याबाबत

**(४३) १४०५७४ (१३-०७-२०१९). श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे येथील वृक्ष गणनेसाठी सिस्टीम आणि ग्लोबल पोझिशनिंग सिस्टीम करण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खाजगी संस्थेची नेमणूक करून शहरातील वृक्ष गणनेचे काम सदर खाजगी संस्थांना देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कामास रुपये ९ कोटी खर्च करुनही शहरात नेमकी किती झाडे आहेत याची आकडेवारी वर्षानंतरही महानगरपालिकेला मिळू शकलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, ठेकेदार संस्थेकडून आत्तापर्यंत झालेल्या कामाचा अहवाल वृक्ष प्राधिकरण समितीकडे सोपविला नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, पुणे शहरातील वाढत्या नागरीकरणाचा परिणाम पट्ट्यावर होत असल्याने नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून वृक्ष गणना करण्याच्या महानगरपालिकेच्या निर्णयाबाबत पैसा खर्च करूनही माहिती उपलब्ध झाली नसल्याने सदर प्रकरणातील संस्थेचे पुढील देय रक्कम देण्यास प्रतिबंध करण्यात येणार आहे,
(६) असल्यास, संबंधित प्रकरणाची चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१९) :** (१) पुणे महानगरपालिकेमार्फत वृक्ष गणना करण्यासाठी जी.आय.एस. व जी.पी.एस. तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे, हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३), (४) व (५) • या कामाकरिता नियुक्त करण्यात आलेल्या ठेकेदाराचे कामकाज पडताळून पाहण्याकरिता तज्ञ समिती गठीत करण्यात आली असून संबंधीतांना दर १ लाख वृक्षांची गणना पूर्ण झाल्यानंतर तज्ञ समितीचा तपासणी अहवाल सादर झाल्यानंतर तसेच ठेकेदाराने देयके सादर केल्यानंतर त्याला देयक अदा करण्याची दक्षता घेण्यात येते, असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.
• पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील सुमारे ४००९६२३ एवढ्या वृक्षांची गणना करण्यात आलेली असून सदर वृक्षगणनेची माहिती पुणे महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आली आहे, असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.
(७) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गडचिरोली, चामोर्शी व धानोरा या तालुक्यामधील वन तलावांबाबत

**(४४) १४०६८० (१५-०७-२०१९). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली मध्ये सन २०१४-१५ ते २०१९-२० या कालावधीत वनतलावांचे बांधकाम कोणत्या योजनेमधून व त्यासाठी किती निधी मंजूर करण्यात आले आहे,
(२) असल्यास, गडचिरोली, चामोर्शी व धानोरा या तीन तालुक्यात किती वनतलाव मंजूर करण्यात आले आहेत,
(३) असल्यास, सद्यस्थितीत किती वनतलाव सुस्थितीत आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (११-०९-२०१९)** : (१) सन २०१४-१५ ते २०१९-२० या कालावधीत गडचिरोली जिल्हयात जिल्हा योजना-संयुक्त वनव्यवस्थापन, निसर्ग पर्यटन, वन्यजीव व्यवस्थापन, वनतळे-सिमेंटबंधारे, मृद व जलसंधारण, जलयुक्त शिवार, मग्रारोहयो अशा विविध योजनांतून एकूण ३७ वनतलावांचे बांधकाम करण्यात आले असून त्याकरिता एकूण रु.११६.८२ लक्ष निधी खर्च करण्यात आला आहे.

(२) गडचिरोली, धानोरा व चार्मोशी या तीन तालुक्यात एकूण ८ वन तलाव बांधण्यात आले आहेत.

(३) सन २०१४-१५ ते २०१९-२० पर्यंत बांधण्यात आलेले सर्व ३७ तलाव सुस्थितीत आहेत.

---

### राज्यातील शतकोटी वृक्ष लागवड योजना बुलडाणा जिल्हयामध्ये असफल ठरल्याबाबत

**(४५) १४०७४८ (१२-०७-२०१९). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या शतकोटी वृक्ष लागवड योजनेअंतर्गत बुलढाणा जिल्ह्यामध्ये तेवढ्या प्रमाणात वृक्ष लागवड झाली नसल्याचे माहे एप्रिल, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वृक्ष लागवड करण्याबाबत तसेच शासनाचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी तसेच त्यांचे संगोपन करण्यासाठी बुलढाणा जिल्ह्यात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (११-०९-२०१९)** : (१) व (२) सन २०१२-१३ ते २०१५-१६ या कालावधीमध्ये राज्य शासनाने वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत वेळोवेळी वाटप केलेल्या उदिदष्टानुसार बुलढाणा जिल्हयामध्ये वृक्ष लागवड व त्यांचे संगोपन करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने भू-संपादित केलेल्या जमिनीच्या मूळ मालकांना १२.५% परतावा मिळणेबाबत

**(४६) १४०८०७ (१३-०७-२०१९). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासन निर्णयनुसार पिंपरी चिंचवड प्राधिकरण येथील ज्या शेतक-यांची जमीन प्राधिकरणाने सन १९८४ नंतर संपादित केली आहे त्या शेतक-यांना जमीन संपादनाच्या १२.५ टक्के परतावा जमीन वाटप प्राधिकरणाकडून देण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापही शेतक-यांना १२.५ टक्के परतावा जमीन प्राधिकरणाकडून केला जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार शेतकऱ्यांना १२.५% परतावा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१९) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सन १९८४ नंतर जमीन संपादित केलेले एकूण ४४० लाभार्थी असून त्यापैकी ३५८ लाभार्थी यांना परतावा लाभ देण्यात आलेला आहे. उर्वरित ८२ लाभार्थ्यांपैकी ४७ प्रकरणातील लाभार्थ्यांनी नवीन भूसंपादन कायद्यातील तरतुदींच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयात जमिनीच्या वाढीव मोबदल्यासाठी रिट पिटीशन दाखल केले आहे. २२ प्रकरणातील लाभार्थींच्या संपादित जमिनीवर अतिक्रमणे आहेत. एका प्रकरणात मा. पुणे न्यायालयात आपसातील वादाबाबत दावा चालू आहे. उर्वरित १२ प्रकरणात वर्तमानपत्रात जाहीरात देऊन तसेच संबंधितांना नोटीस देऊन देखील प्रस्ताव दाखल नाहीत. त्याबाबत पुढील कार्यवाही चालू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पिंपरी- चिंचवड औद्योगिक परिसरातील उद्योगांच्या पुनर्वसनासाठी असलेल्या टी-२०१ पुनर्वसन प्रकल्पाबाबत

**(४७) १४१४८३ (१३-०७-२०१९). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पिंपरी-चिंचवड औद्योगिक परिसरातील निवासी भागातील उद्योगांचे औद्योगिक भागात पुनर्वसन करण्यासाठी महानगरपालिकेकडून टी-२०१ पुनर्वसन प्रकल्प राबविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एमआयडीसीने जागा उपलब्ध करून दिलेली असताना देखील गत २५ वर्षांपासून सदर प्रकल्प प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकल्पात गाळे मिळण्यासाठी १० वर्षांपूर्वी १४५ उद्योजकांनी रु.३००००.०० बुकिंग रक्कम महानगरपालिकेच्या मागणीनुसार भरली असून अद्यापही गाळे मिळालेले नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून या प्रकल्पास विलंब होण्याची काय कारणे आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१९) :** (१), (२), (३) व (४) पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील भोसरी, एमआयडीसी प्लॉट क्र.टी-२०१ एमआयडीसीकडून भाडेपट्टयाने महानगरपालिकेस प्राप्त झाला आहे.

या भूखंडावरील प्रकल्पासाठी लघुउद्योजकांची इच्छुकता पाहण्यासाठी सन २००६ मध्ये अर्ज मागविले होते.

प्रकल्पाच्या कामाचे आदेश सन २००८ मध्ये देण्यात आले.

सदर प्रकल्प मागील ११ वर्षापासून चालू असून सद्य:स्थिती प्रकल्पाचे काम ९०% पूर्ण झालेले आहे.

प्रकल्पातील एकूण १८३ गाळेधारकांपैकी एकूण ८३ गाळेधारकांना रु. २५०००/- चे डी.डी. भूमी व जिंदगी विभागात जमा केले आहे.

सदर प्रकल्पास पुरेशी आर्थिक तरतूद उपलब्ध नसल्यामुळे प्रकल्पाचे काम विहित कालावधीत होऊ शकले नाही. तथापि महानगरपालिकेकडून पुरेशी तरतूद उपलब्ध करुन दिल्यानंतरही ठेकेदाराने काम पूर्ण न केल्याने संबंधीत ठेकेदारावर निविदा शर्ती व अटीनुसार कारवाई करण्यात आली आहे.

उर्वरित कामासाठी निविदेबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे. असे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने कळविले आहे.

---

## पुणे महानगरपालिकेतील कर्मचारी वसाहतीमधील ३ इमारती धोकादायक असल्याबाबत

**(४८) १४१९०२ (१३-०७-२०१९). श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेतील कर्मचारी वसाहतीमधील ३ इमारती धोकादायक आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांच्या निवासी वापरासाठी बांधण्यात आलेल्या इमारतीपैकी ३ इमारती धोकादायक असून त्यांची दुरवस्था झाल्याचे दिनांक १७ मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१९) :** (१) व (२) पुणे महानगरपालिकेमार्फत पावसाळापूर्व सर्व्हे करण्यात आला असता वाकडेवाडी या महानगरपालिका वसाहतीमधील ३ इमारती सकृत दर्शनी धोक्याच्या झालेल्या असल्याचे निदर्शनास आले.

(३) व (४) पुणे महानगरपालिकेमार्फत सदरहू संपूर्ण वसाहती BOT तत्वावर विकसित करण्याकरिता विकासकाची नेमणूक करण्यात आलेली आहे. या विकासकाकडून सदरहू धोक्याच्या इमारतीमध्ये राहणाऱ्या नागरिकांसाठी सदर ठिकाणी तात्पुरत्या निवासाची व्यवस्था करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे. तसेच महानगरपालिकेच्या चाळ विभागाकडून नागरिकांचे पर्यायी जागेत स्थलांतरित होण्याबाबत प्रबोधन करण्यात येत आहे. तथापि, नागरिकांचा घर सोडण्याकामी विरोध असल्यामुळे विलंब होतो आहे, हे खरे आहे.

---

### पुणे, बी.आर.टी.मार्ग-सातारा रस्त्यावरील रस्त्याच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(४९) १४२४७८ (०९-०७-२०१९). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे, बी.आर.टी. मार्ग-सातारा रस्त्यावरील रस्त्याच्या कामात अनेक त्रुटी असून बहुतांश कामे ही अपूर्ण आणि निकृष्ट दर्जाची झाली असल्याचे माहे मार्च-२०१९ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या कोट्यवधींच्या खर्चाच्या निकृष्ट कामाची चौकशी सर्व स्तरावरून लोकप्रतिनिधी, सामाजिक संस्थांकडून होत असतांना अद्यापही संबंधित प्रशासनाकडून कुठलीही कार्यवाही झाली नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त ठिकाणच्या कामांसाठी महानगरपालिकेकडून अनुक्रमे १०८, १८ आणि २२ कोटी रुपयांची तरतूद उपलब्ध केली असून पदपथ, बसथांबे यासह विविध विकासकामे करण्याच्या कामामध्ये संबंधित कामाचे ठेकेदार आणि कन्सलटंट, अधिकारी यांच्या माध्यमातून संगनमताने गैरव्यवहार झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर कामांसाठी आजमितीस किती निधी खर्च करण्यात आला याबाबत ठेकेदार, कन्सल्टंट सह तपशीलवार माहिती काय आहे,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधित प्रशासनाच्या वतीने कोणतीही कार्यवाही होत नसल्याने शासनाकडून सखोल चौकशी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०९-२०१९) :** (१) व (२) पुणे-सातारा बीआरटी रस्ता व सायकल ट्रॅक विकसित करणे या कामांच्या चौकशीबाबत दै. महाराष्ट्र टाईम्स या वृत्तपत्रामध्ये बातमी आलेली असून स्थानिक नगरसेवक तसेच स्थानिक विधानसभा सदस्यांनी पत्रे दिलेली होती, हे खरे आहे.

सदर कामाची व बांधकाम साहित्याची गुणवत्ता तपासण्यासाठी खालील उपाययोजना करत असल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे :

• मे.पेव्हटेक कन्सल्टन्ट या तज्ञ सल्लागार कंपनीमार्फत सदर कामाच्या गुणवत्तेची तपासणी करण्यात येते.

• तसेच निविदा अटी शर्तींनुसार १०% कामाच्या दर्जाची व बांधकाम साहित्याची तपासणी त्रयस्थ प्रयोगशाळेमार्फत करण्यात येते.

• त्रयस्थ प्रयोगशाळेच्या अहवालानुसार बांधकाम साहित्य व प्रत्यक्ष कामाची गुणवत्ता योग्य असल्याचे निश्चित केले आहे, असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

• प्रत्यक्ष कामाच्या जागेवर गुणवत्ता तपासणी लॅबोरेटरी उभारण्यात आलेली असून त्याव्दारे कॉंक्रिटची क्षमता, इतर बांधकाम साहित्याची क्षमता तपासण्याचे काम तज्ञ सल्लागार कंपनीमार्फत करण्यात येते.

• कामाच्या दर्जाबाबत खात्री केल्यानंतरच संबंधित कंत्राटदारांना बिल अदा करण्यात येते.

(३) व (४) • प्रस्तुत प्रकल्पाकरीता निविदा क्र. २६५-२०१६ करीता रु. ७४.५४ कोटी इतक्या रकमेच्या पूर्वगणन पत्रकातील कामाकरीता ठेकेदारास दि. ०२.०१.२०१७ रोजी कामाचे कार्यादेश देण्यात आले आहेत.

• जागेवरील काम पूर्ण झाल्यानंतर रु. २८.९९ कोटीच्या वाढीव कामांसाठी निविदा प्रक्रीया पूर्ण करुन दि. ०८.०३.२०१९ रोजी कामाचे कार्यादेश देण्यात आले आहेत.

• निविदा अटी शर्तीनुसार बांधकाम साहित्य व प्रत्यक्ष कामाचा दर्जा यांची तपासणी करुनच ठेकेदारास बिल अदा करण्यात येते.

• तसेच या प्रकल्पाचे सेफ्टी ऑडीट आय.आय.टी. पवई यांच्याकडून करण्याकरीता पुणे महानगरपालिकेकडून कार्यवाही सुरु आहे, असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) या प्रकरणी स्थानिक विधानसभा सदस्यांनी शासनास दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने तपासणी करुन दि. ०८.०१.२०१८ च्या शासन पत्रान्वये विविध विकास कामांच्या तसेच पुणे-सातारा रस्त्याच्या पुनर्बांधणीबाबतच्या प्रकरणी पुणे महानगरपालिकेस मार्गदर्शक सूचना दिलेल्या असून त्या अनुषंगाने दक्षता घेण्याबाबत कळविले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे येथील गार्नेटस वे व्हेस्कोन लि. विमाननगर नगर रोड या बांधकाम प्रकल्पात ॲमीनिटी स्पेसच्या जागेवर अनधिकृत बांधकाम केल्याबाबत

**(५०) १४२४८२ (०९-०७-२०१९). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील गार्नेटस वे व्हेस्कोन लि. विमाननगर नगर रोड या बांधकाम प्रकल्पात ॲमीनिटी स्पेसच्या जागेवर अनधिकृत बांधकाम केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मिळकतीतील ॲमीनिटी स्पेसच्या जागेवरील अनधिकृत बांधकामाबाबत महानगरपालिकेकडून नोटीस देण्यात आल्यानंतर नोटीसीच्या अनुषंगाने सादर केलेल्या खुलाशाबाबत तपासणी जाणीवपूर्वक संथ गतीने सुरू आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून नोटीसच्या अनुषंगाने सादर केलेल्या खुलाशाबाबत लवकरात लवकर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०९-२०१९) :** (१), (२) व (३) पुणे येथील गार्नेटस वे व्हेस्कोन लि. स.नं.१९७/३ विमाननगर नगर रोड या बांधकाम प्रकल्पात कोणते अनधिकृत बांधकाम सुरु असल्याचे निदर्शनास आले नाही. तसेच सर्व्हे नं.१९७/३ या मिळकतीमध्ये विकास आराखड्यानुसार कोणतेही आरक्षण नाही त्यामुळे आरक्षित जागेवर अनधिकृत बांधकाम करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही, असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

तसेच या मिळकतीतील मान्य लेआऊट मधील ॲमीनिटी स्पेसच्या जागेमध्ये सन १९९७ च्या विकास नियंत्रण नियमावलीनुसार व्यापारी इमारतीचे नकाशे मंजूर असून त्याप्रमाणे मान्य नकाशानुसार संपूर्ण इमारतीचे बांधकाम पूर्ण झालेले असून झालेल्या बांधकामानुसार सदर इमारतीस पार्ट भोगवटापत्र देण्यात आलेले आहे.

स.नं १९७/३ मधील व्यापारी मिळकतीतील गाळेधारकांना जुलै, २०१७ मध्ये गाळयांच्या वापराबाबत पुणे महानगरपालिकेकडून नोटीस देण्यात आली असून नोटीसीच्या अनुषंगाने गाळेधारकांनी सादर केलेल्या खुलाशाबाबत तपासणी सुरु आहे असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**

**मुंबई.**

**सचिव**

**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.